नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १७० | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार, दि. २६ मे २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### मास्टर की वापरून रूममध्ये कर्मचारी

कोलवा(स. गांवकरी) : गोव्यातील कोलवा परिसरातल्या एका बड्या हॉटेलमध्ये धक्कादायक घटना घडली. पर्यटनासाठी आलेले दांपत्य हॉटेलच्या रूमवर गाढ झोपले होते. त्यावेळी विना परवानगी हॉटेलचा कर्मचारी मास्टर की वापरून थेट रूमध्येच शिरला. ही घटना २२ मे रोजी घडली. एक मराठी दांपत्य गोवा फिरण्यासाठी गेले होते. या दांपत्याने बड्या हॉटेलमध्ये रूम बुक केली होती. रात्री बुक केलेल्या रूममध्ये दांपत्य विश्रांती घेत होते. ते गाढ झोपेत होते, त्यावेळी हॉटेलचा कर्मचारी मास्टर की वापरून थेट रूमध्येच शिरला परवानगी न घेताच हॉटेलचा कर्मचारी रात्रीच्या वेळी रूममध्ये घुसला होता. ही धक्कादायक घटना रात्री बाराच्या सुमारास घडली. दांपत्य गाढ झोपेत होते. पण कोणीतरी रूमचे लॅच उघडत असल्याची जाणीव होताच पतीला जाग आली त्याने रूममध्ये शिरत असलेल्याला जाब विचारला. आपल्याला जाब विचारत असल्याचे लक्षात येताच रूममध्ये घसणाऱ्याने दरवाजातून पळ काढण्याचा प्रयत्न केला. पतीने लगेच दरवाजाजवळ तिथे कोण होते ते तपासले. त्यावेळी हॉटेलचा कर्मचारीच रूममध्ये घुसखोरी करत असल्याचे त्याच्या लक्षात आले.

### मंदिर सुशोभीकरण प्रकल्पामुळे नवे रूप

मुंबई (स. गांवकरी) : सिद्धिविनायक मंदिरात देश विदेशातून भाविक येत असतात. भाविकांना सुलभ व कमी वेळामध्ये सिद्धिविनायकाचे दर्शन झाले पाहिजे. मंदिर परिसरात पायाभूत सुविधांची कामे करण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून मंदिर परिसराचे सुशोभीकरण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या पूर्णत्वामुळे श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराला नवे रूप मिळणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराच्या सुशोभीकरण पहिल्या टप्प्यातील कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. भूमिपूजन नंतर माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना मुख्यमंत्री बोलत होते.

### हायस्पीड रेल्वेसाठी शाह यांना साकडे


नवी दिल्ली (स. गांवकरी) :लोककला क्षेत्रात कार्यरत असल्याने सातत्याने लोकांमध्ये वावरत असतो, त्यामुळे जनतेचा सांस्कृतिक प्रतिनिधी या नात्याने पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या तमाशा महर्षी रघुवीर खेडकरांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची दिल्लीत भेट घेतली. याप्रसंगी त्यांनी नाशिक पुणे हायस्पीड प्रकल्पाचा नव्याने विचार करण्याची तसेच या प्रकल्पाला मंजुरी देण्यासाठी रेल्वे मंत्रालयाशी चर्चा करण्याची विनंती केली. पद्म पुरस्कार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते तमाशा महर्षी रघुवीर खेडकर यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. यानंतर झालेल्या सोहळ्यात खेडकर यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली.

### खोलवर सापडले आठ तरुणांचे मृतदेह

रायगड (स. गांवकरी) : रायगड आणि सातारा या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या महाबळेश्वर-पोलादपूर मार्गावरील धोकादायक आंबेनळी घाटात मध्यरात्री अपघात झाला. प्रवाशांनी भरलेली स्कॉर्पिओ जीप अनियंत्रित झाली आणि सुमारे ७०० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात जीपमध्ये बसलेल्या आठ तरुणांचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलादपूर पोलीस, स्थानिक प्रशासन आणि विविध बचाव पथके तात्काळ घटनास्थळी पोहोचली.

# महाराष्ट्रातील ८ मान्यवरांचा दिल्लीत सन्मान

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंच्याहस्ते पद्म पुरस्कार, हेमा मालिनींच्या हाती धर्मेंद्र यांचा अवॉर्ड



नवी दिल्ली : (स. गांवकरी)

देशातील महत्वाचे नागरी सन्मान असलेल्या 'पद्म पुरस्कारांचे' वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज सन्मानपूर्वक करण्यात आले. महाराष्ट्रातील आठ मान्यवरांना त्यांच्या विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले. राष्ट्रपती भवनातील 'गणतंत्र मंडप' येथे आयोजित या समारंभास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन , पंतप्रधान नरेंद्र मोदी , केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच अन्य केंद्रीय मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते. आज पार पडलेल्या पहिल्या टप्प्यातील समारंभात महाराष्ट्रातील आठ मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यामध्ये ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांना कला क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल मरणोत्तर 'पद्मविभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांच्या पत्नी व खासदार हेमा मालिनी यांनी स्वीकारला. सहा दशकांहून अधिक काळ हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे धर्मेंद्र यांनी 300 हून अधिक चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या. गेल्या नोव्हेंबरमध्ये वयाच्या 89 व्या वर्षी त्यांचे निधन झाले होते. दोन मान्यवरांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यात कोटक महिंद्रा बँकेचे संस्थापक उदय कोटक यांचा समावेश आहे. त्यांनी एका छोट्या बिल डिस्काउंटिंग स्टार्टअपपासून देशातील अग्रगण्य खासगी बँक उभी करून भारतीय बँकिंग क्षेत्रात नवे मानदंड निर्माण केले. कॉर्पोरेट गव्हर्नन्स आणि आर्थिक धोरण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना गौरविण्यात आले. जाहिरात क्षेत्रातील सर्जनशीलतेचे प्रतीक मानले जाणारे पीयूष पांडे यांना मरणोत्तर 'पद्मभूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या पत्नी नीता जोशी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

पाच मान्यवरांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यात जनार्दन बापुराव बोठे यांना सामाजिक कार्यासाठी सन्मानित करण्यात आले. ग्रामीण महाराष्ट्रात जलसंधारण आणि शिक्षण क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' मोहिमेद्वारे अनेक गावांचा पाणीप्रश्न सोडवण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले.

रघुवीर खेडकर यांना कला प्रकारातील तमाशा लोककलेसाठी पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथील ज्येष्ठ तमाशा कलावंत कांताबाई सातारकर यांचे पुत्र रघुवीर खेडकर असलेले यांनी महाराष्ट्राची पारंपरिक लोककला 'तमाशा' जागतिक स्तरावर पोहोचवली असून लोककलेच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधनाचे कार्यही त्यांनी केले आहे. श्रीरंग लाड यांना कृषी क्षेत्रातील कार्यासाठी पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला.

परभणीचे प्रयोगशील शेतकरी आणि भारतीय किसान संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते असलेल्या लाड यांनी 'दादा लाड तंत्रज्ञान' विकसित करून कापूस उत्पादन वाढीसाठी मोठे कार्य केले. 'लाल कंधारी' गाईंच्या संवर्धनासाठीही त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. नागपूरस्थित उद्योजक सत्यनारायण नुवाल यांनी 'सोलर इंडस्ट्रीज'च्या माध्यमातून संरक्षण क्षेत्र आणि खाणकाम उद्योगात मोठे योगदान दिले आहे. डिफेन्स एक्सप्लोझिव्ह क्षेत्रात भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या योगदानासाठी त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### दोन टप्प्यात पुरस्कारांचे वितरण

यंदाच्या पद्म पुरस्कार वितरण दोन टप्प्यांत होत असून, आजच्या पहिल्या टप्प्यात देशभरातील 66 मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यामध्ये दोन पद्मविभूषण, सहा पद्मभूषण आणि 58 पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. यंदाच्या पद्म पुरस्कार यादीत एकूण 131 पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, त्यामध्ये 5 पद्मविभूषण, 13 पद्मभूषण आणि 113 पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. एकूण पुरस्कारार्थींमध्ये 19 महिला असून, 16 मान्यवरांना मरणोत्तर सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

# भारताच्या अर्थव्यवस्थेची वेगाने झेप : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




मुंबई : (स. गांवकरी)

जगातील युद्धजन्य परिस्थिती निवळताच भारताची अर्थव्यवस्था वेगाने झेप घेईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळाची नोंद घेणाऱ्या 'राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती' या विशेष संग्राह्य अंकाचे प्रकाशन प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे मुखमंत्र्यांच्या हस्ते झाले. या विशेषांकामध्ये मोदी सरकारचे १२ वर्षांतील महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय आणि विविध क्षेत्रांतील कामगिरीचा लेखाजोखा मांडण्यात आला आहे. भाजपचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी याचे संपादन केले आहे. आज जगातील जवळपास प्रत्येक देश, मग तो राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील अमेरिका असो, रशिया, इस्रायल, इराण किंवा युरोपीय राष्ट्रे असो, भारत आणि मोदी यांची मुक्तकंठाने प्रशंसा करत आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्था विस्कळीत झाल्या असल्या तरी, मोदींच्या नेतृत्वाखाली भारत अत्यंत भक्कम आहे, असा विश्वास जगभरचे उद्योजक व्यक्त करत आहेत. ही परिस्थिती निवळताच भारताची अर्थव्यवस्था वेगाने झेप घेईल, असे फडणवीस यांनी नमूद केले. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने अनुदानप्रणित अर्थव्यवस्थेवर भर देत गरिबाला गरीबच ठेवले. परंतु मोदी सरकारने पायाभूत सुविधांचा विकास करत गरिबांना आत्मनिर्भर बनवले. गेल्या दहा वर्षात २५ कोटी लोकाना दारिद्र्यरेषेच्या बाहेर काढले. हे करणारा भारत हा एकमेव देश आहे. मोदी सरकारच्या काळात यूपीआय, जीएसटी, डीबीटी, एफडीआयसारखे महत्त्वाचे निर्णय घेतले गेले. गेल्या दशकात देशांतर्गत उत्पादन जवळपास तिप्पट झाले. देशात झालेला कायापालट हा 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेच्या यशाचेच प्रतिबिंब आहे. संरक्षण तंत्रज्ञान, शस्त्रे आणि दारूगोळा यासाठी एकेकाळी आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेला भारत, आता अनेक देशांना संरक्षण साहित्य पुरवणारा एक निर्यातदार देश म्हणून उदयाला आला आहे, अशा शब्दात त्यांनी देशाची वाढती आत्मनिर्भरता अधोरेखित केली.

# विरोधी पक्षांच्या निष्क्रियतेवर अंजली दमानिया यांचे बोट

पुणे : (स. गांवकरी)



सध्या महाराष्ट्रातील एकाही नेत्याला व्हिजन नाही. एकनाथ शिंदे आहेत, देवेंद्र फडणवीस आहेत; मात्र महाराष्ट्रासाठी 'ब्लू प्रिंट' सांगू शकेल, असा एकही नेता नाही. पण, अजूनही देवेंद्र फडणवीसांबद्दल आदर वाटतो. या एकट्या माणसाचं चारित्र्य तरी चांगलं आहे. बाकीच्या गोष्टी आपण सोडून देऊ, पण देवेंद्र फडणवीसांकडे निदान एक व्हिजन आहे. त्यांच्याबरोबरचा एकही माणूस मात्र काम करताना दिसत नाही,' असे परखड मत सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सोमवारी पुण्यातील एका कार्यक्रमात व्यक्त केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या पक्षातील आमदारांच्या पात्रतेवरही अंजली दमानिया शंका उपस्थित केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेतील आमदारांवर बोलताना दमानिया म्हणाल्या,'संजय शिरसाट आणि एकनाथ शिंदेंनी त्यांच्या पक्षात प्रवेश करण्यासाठी मला बोलावले होते. त्यावेळी शिंदेंना तुमच्या नेत्यांनी, तुमच्या आमदारांनी तोंड उघडले की, त्यांची पात्रता कळते, असे सांगितले होते. कारण, ते संजय बांगर आणि बाकीच्यांकडे बघूनच यांच्याकडे काय 'व्हिजन' असणार आणि ते काय देशाला पुढे घेऊन जाणार ? हे राजकारण असेच राहिले, आपण हिंदू-मुस्लिम, अमुक-तमुक करत राहिलो, तर भविष्यात काय होईल, याची चिंता वाटते.' 'आता आपल्या सामान्य जनतेला लढावे लागेल. कसे लढायचे हे आपण सगळे मिळून ठरवू,' अशी सादही अंजली दमानिया यांनी घातली.

# १ हजार ५८० रुपयानं कांद्याची खरेदी होणार, शेतकऱ्यांमध्ये नाराजी

मुंबई : (स. गांवकरी)

कांदा उत्पादक शेतकऱ्यासंदर्भात एक महत्वाची बातमी समोर आली आहे. लासलगाव आंदोलनानंतर केंद्र सरकारकडून रब्बी कांदा 2026 खरेदीसाठी MAPP जाहीर केली आहे. 26 मेपासून कांद्याला प्रतिक्विंटल 1 हजार 580 रुपये दर लागू करण्यात येणार आहे. दरम्यान, सरकारच्या या निर्णयानंतर शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर कायम असल्याचे दिसत आहे. कारण, उत्पादन खर्चाच्या तुलनेत दर अपुरा असल्याची प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली आहे. त्याचबरोबर सरकारने जाहीर केलेल्या दरावर शेतकरी संघटनांच्या नेत्यांनी देखील टीका केली आहे.

केंद्राच्या ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाच्या ग्राहक व्यवहार विभागाने नाशिक जिल्ह्यातील रब्बी कांदा 2026 खरेदीसाठी किमान आश्वासित खरेदी किंमत अर्थात MAPP जाहीर केली आहे. यानुसार 26 मे 2026 पासून कांद्याला प्रतिक्विंटल 1 हजार 580 रुपये दर लागू राहणार आहे. मात्र हा दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत अपुरा असल्याची भावना शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे..कांदा उत्पादनासाठी प्रति किलो 20 ते 25 रुपये खर्च येत असून खत, औषधे, मजुरी आणि वाहतूक खर्च सातत्याने वाढत असल्याने उत्पादन खर्चावर आधारित योग्य बाजारभाव निश्चित करावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. दरम्यान, कांद्याला हमीभाव मिळावा यासाठी उद्या ( दिनांक 26 ) चांदवड येथे आमदार रोहित पवार यांच्यासह विविध पक्षांच्या राजकीय पदाधिकारी व कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने मोर्चा व रास्ता - रोको आंदोलनाचे आयोजन केले आहे. केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार व अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाच्या ग्राहक व्यवहार विभागाने नाशिक जिल्ह्यातील रब्बी कांदा खरेदीसाठी किमान आश्वासित खरेदी मूल्य अर्थात MAPP प्रतिक्विंटल 1580 रु. जाहीर केला आहे. हे फक्त शेतकऱ्यांचा आंदोलन बघता त्यांचा रोष कमी करण्यासाठी सरकारने पाऊल उचलला आहे. खरं तर कांदा उत्पादनासाठी प्रतिक्विंटल 1700 ते 2000 रुपये खर्च येत असताना सरकारने अतिशय कमी मूल्य हे जाहीर केले आहे. हे मूल्य जाहीर करत असताना राज्यात अनेक जिल्ह्यात कांदा उत्पादक शेतकरी असताना फक्त हे नाशिक जिल्ह्यासाठीच का..? असा सवाल ही रविकांत तुपकर यांनी सरकारला विचारला आहे. कांद्यावर निर्यात शुल्क न लावता कांदा निर्यात केला पाहिजे तरच कांदा उत्पादक शेतकरी जगेल असेही रविकांत तुपकर यांनी म्हटले आहे.



# उपवर्गीकरणाला कोणत्या सरकारने दिले बळ

## या अहवालात मातंग समाजाला ५ टक्के आरक्षणाची शिफारस

मुंबई : (स. गांवकरी)

अनुसूचित जातीच्या १३ टक्के आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा विषय राज्यात तीन दशके धुमसत असून तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारने गठीत केलेल्या क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या अहवालात उपवर्गीकरणाव्दारे मातंग समाजाला स्वतंत्रपणे ५ टक्के आरक्षण देण्याची शिफारस केली होती. राज्यात अनुसूचित जातींना १३ टक्के आरक्षण असून या प्रवर्गात ५९ जाती आहेत. बौद्ध व चर्मकार समाजाला १३ टक्के आरक्षणाचा बहुंताश लाभ मिळत असून १९ टक्के असलेल्या मातंग समाज वंचित राहिल्याचा आरोप होतो. २००३ मध्ये आघाडी सरकारने माजी सामाजिक न्याय मंत्री बाबुराव भारस्कर यांच्या अध्यक्षतेखाली साळवे मातंग समाज अभ्यास आयोग नेमला. आयोगाने २००८ मध्ये आपला अहवाल सादर केला.

या अहवालात मातंग समाजाच्या उन्नतीसाठी ८२ शिफारसी होत्या. तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या सरकारने २०११ मध्ये ६८ शिफारसी मान्य केल्या आणि उपवर्गीकरणासह १४ शिफारसी फेटाळून लावल्या. उपवर्गीकरणाचा विषय आज शेवटच्या टप्प्यात आहे. भाजपा व संघ परिवार उपवर्गीकरणव्दारे दलितांमध्ये फूट पाडत असल्याचा आरोप होतो आहे. मात्र उपवर्गीकरणाची ठिणगी आघाडी सरकारच्या काळात पडल्याचे साळवे आयोगाचा अहवाल सांगतो.

राज्यातील ५९ अनुसूचित जाती एकजनसी समजून एका प्रवर्गातून आरक्षण देणे चुकीचे होते. त्यामुळे १३ टक्के आरक्षणाच्या लाभाचे विषम वाटप झाले. सामाजिक न्याय विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या १६ योजनांमध्ये बहुतांश लाभ बौद्ध आणि चर्मकार समाजाला मिळाला. समाज कल्याण मंत्री बौद्ध असल्याने बौद्ध विद्यार्थ्यांना विशेष बाब म्हणून वसतीगृहात प्रवेश मिळत असे. मातंग समाजाला संधी मिळाली नसल्याने हा समाज शेतमजूर आणि बांधकाम मजुरीतून बाहेर पडू शकला नाही, असे साळवे अहवालात म्हटले आहे.



शासनाच्या एकाही विभागाने आजपर्यंत ६८ शिफारसीपैकी शासन निर्णय काढला नाही की अंमलबजवणी केली नाही.

**– मारोती वाडेकर, समन्वयक, सकल मातंग समाज, नांदेड**

साळवे आयोग अहवालाने अनुसूचित जातीचा 'इम्पिरिकेल डेटा' समोर आणला. सर्वोच्च न्यायालयाने उपवर्गीकरणाबाबत दिलेल्या निकालात या अहवालाची दखल घेतली आहे.

**– प्रा. बी. एस. वाघमारे, जवाहरलाल नेहरु विद्यापीठाचे माजी प्राध्यापक व साळवे अभ्यास आयोगाचे संकलक**

बौद्ध तरुणांनी पँथर, रिपाइं गट, बसप व्दारे दबाव गट निर्माण केला. ख्रिश्चन धर्मामध्ये गेल्यानंतर नैराश्य आलेला मातंग समाज बौद्ध धर्मापासून फटकून राहिला. काँग्रेसने मात्र कायम बौद्धांना झुकते माप दिले. २००३ पर्यंत २२ समाज कल्याण मंत्री झाले. त्यामध्ये केवळ ७ मातंग आहेत. लोकसभा ते ग्रामपंचायती पर्यंतच्या निवडणुकांमध्ये राखीव मतदारसंघात बौद्ध आणि चर्मकारांना काँग्रेसने कायम संधी दिली.

# एनडीए सरकार पडण्याच्या भाकितावर मंत्री नितेश राणेंचा पलटवार

मुंबई : (स. गांवकरी)

राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे खात्याचे मंत्री नितेश राणे यांनी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली. मंत्री राणे यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी 'पाकिस्तानी एजंट' म्हणून काम करत असल्याचा आरोप केला. "राहुल गांधींची वक्तव्ये बाहेरील सूत्रधारांच्या आधारावर असतात", अशी टीका राणेंनी केली. "सध्याच्या आर्थिक संकटामुळे एनडीए सरकार पुढच्या वर्षापर्यंत टिकणार नाही", असे राहुल गांधी म्हणाले होते, याला राणेंनी उत्तर दिले. देशातील आर्थिक संकटावर राहुल गांधींनी भाष्य करताना पुढच्या वर्षापर्यंत एनडीए सरकार टिकणार नाही अशा शब्दात टीका केली. राहुल गांधींच्या या वक्तव्यावर नितेश राणे यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. राहुल गांधी हे सीमेपलीकडील हितसंबंधांना खूश करण्याच्या उद्देशानेच बोलत असल्याचा आरोप नितेश राणेंनी केला. काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाच्या सल्लागार परिषदेच्या बैठकीदरम्यान राहुल गांधींनी केंद्र सरकार आणि पंतप्रधान मोदींवर टीका केली होती. मंत्री राणेंनी पत्रकारांशी संवाद साधताना राहुल गांधींवर टीका केली. "राहुल गांधी पाकिस्तानी एजंट आहेत. ते स्वतः पाकिस्तानबद्दल बोलतात", असा आरोप राणे यांनी पत्रकारांशी बोलताना केला. "राहुल गांधी इथं एक स्क्रिप्ट वाचतात, पण ती मूळची तिथली असते. पाकिस्तानी वरिष्ठांना खूश करण्यासाठी, त्यांचे एजंट राहुल गांधी इथे आले आहेत आणि त्यांनी पंतप्रधान मोदींविरुद्ध वक्तव्यं केलं आहे", असे राणे म्हणाले. दरम्यान, राहुल गांधींनी केंद्राच्या आर्थिक धोरणांवर टीका करत, सध्याच्या सरकारचा पाया कमकुवत असल्याचे मत व्यक्त केले होते.

इंधन दरवाढीवरून राहुल गांधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर 'एक्स'वरुन टीका केली. पंतप्रधानांना "महागाईवाले मोदी" असे संबोधत टीकास्त्र सोडले. महागाईवाल्या मोदींनी पुन्हा धक्का दिला. ते पेट्रोल-डिझेलच्या किमती टप्प्याटप्प्याने वाढवतात, जेणेकरून तुमच्या खिशाला हळूहळू झळ बसत राहील. मी अनेक महिन्यांपासून येणाऱ्या आर्थिक संकटाचा मोदी, नेहमीप्रमाणे, तेव्हा निवडणुकांमध्ये व्यस्त होते, आणि निवडणुका संपताच पेट्रोल-डिझेलमध्ये २८ टक्क्यांनी वाढ झाली," अशा शब्दात राहुल गांधींनी मोदींवर टीका केली होती. ही वाढ अशीच होत राहणार आहे, असंही राहुल गांधींनी पोस्टमध्ये पुढे म्हटलं आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### जंगलाला हेतूपुरस्कर आग लावणारे ४ आरोपी जेरबंद

- करंजाळीचे धडाकेबाज वनपरिमंडळ अधिकारी रवींद्र सोनार आणि पथकाची यशस्वी कामगिरी

पेठ (स. गांवकरी) : उन्हाळ्याच्या दिवसांत जंगलाला लागणारे वणवे आणि त्यामुळे होणारे पर्यावरणाचे नुकसान रोखण्यासाठी नाशिक वनविभाग कमालीचा सतर्क झाला आहे. मौजे कोहोर हद्दीतील भयगाव येथे जंगलाला हेतूपुरस्कर आग लावून हजारो झाडे भस्मसात करणाऱ्या ४ समाजकंटक आरोपींना करंजाळी (पेठ) चे डॅशिंग वनपरिमंडळ अधिकारी रवींद्र सोनार यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने अटक केली आहे. जंगलात वणवा लावणाऱ्या आरोपींचा शोध लागणे अत्यंत दुर्मिळ मानले जात असताना, वनविभागाने केलेल्या या धडक कारवाईमुळे वनतस्करांचे आणि समाजकंटकांचे धाबे दणाणले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी जनार्दन वामन भोये, भास्कर पंढरीनाथ पंडागळे, कांतीलाल सुरेश गाढवे आणि वामन बाळू दळवी यांनी कोहोर परिसरातील रोपवनात काडीपेटीने हेतूपुरस्कर आग लावली. या भीषण वणव्यात परिसरातील जवळपास २५०० झाडे जळून खाक झाली. यामुळे शासनाचे अंदाजे २ लाख ५० हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असून, निष्पाप पशू, पक्षी आणि नैसर्गिक वनसंपदेची अभूतपूर्व हानी झाली आहे. जंगलातील या गंभीर गुन्ह्याची दखल घेत वनपरिमंडळ अधिकारी रवींद्र सोनार आणि त्यांच्या टीमने कसून तपास करत चारही आरोपींना बेड्या ठोकल्या आणि त्यांना कायदेशीर धडा शिकवला. वणवा लावणाऱ्या प्रवृत्तींना जरब बसावी यासाठी वनविभागाने तात्काळ कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ही केस पुढील कारवाईसाठी कोर्टात पाठवली आहे. ही यशस्वी कामगिरी पश्चिम नाशिकचे उपवनसंरक्षक सिद्धेश सावर्डेकर, सहाय्यक वनसंरक्षक निलेश कांबळे आणि पेठचे वनपरिक्षेत्र अधिकारी योगेश साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत करंजाळीचे वनपरिमंडळ अधिकारी रवींद्र सोनार यांना वनरक्षक पुंडलिक राऊत, शंकर सहारे, मझहर शेख तसेच वनमजूर प्रवीण गाढवे, वसंत गुटे, गोरख वाघमारे आणि हेमराज कामडी यांनी मोलाचे सहाय्य केले. वनविभागाच्या या धाडसी कामगिरीबद्दल सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. "जंगलाला आग लावून निसर्गाचा समतोल बिघडवणाऱ्या समाजकंटकांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही," असा इशारा करंजाळीचे वनपरिमंडळ अधिकारी रवींद्र सोनार यांनी दिला आहे.



### खाद्यतेलाच्या नावाखाली बेकायदेशीर डिझेलची वाहतूक करणारा टँकर जप्त.

ठाणे (स. गांवकरी) : मुंबई-नाशिक महामार्गावरील खारेगाव टोलनाक्याजवळ ठाणे शहर गुन्हे शाखा घटक-१ आणि शिधावाटप विभागाच्या संयुक्त पथकाने एक मोठी आणि धाडसी कारवाई केली आहे. खाद्यतेलाच्या नावाखाली बेकायदेशीररीत्या डिझेल सदृश ज्वलनशील पदार्थाची वाहतूक करणारा एक मोठा टँकर या पथकाने जप्त केला असून या कारवाईत तब्बल ४६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. लोकांची दिशाभूल करण्यासाठी संबंधित टँकरवर 'ईडीबल ऑईल' (खाद्यतेल) असे लिहिण्यात आले होते. या प्रकरणी मुख्य आरोपी चालकासह एकूण ८ जणांविरुद्ध कळवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखा घटक-१ ला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे खारेगाव टोलनाक्याच्या अगोदर, मुंब्रा वळण रस्त्याजवळ सापळा रचण्यात आला होता. या ठिकाणी संशयास्पद टाटा कंपनीचा टँकर (क्रमांक MH-46-BB-7134) थांबवून त्याची तपासणी केली असता, त्यात मोठ्या प्रमाणात ज्वलनशील द्रव पदार्थ आढळून आला. टँकर चालकाकडे या डिझेल सदृश पदार्थाची वाहतूक करण्याचा कोणताही परवाना, खरेदी बिल किंवा वैध कागदपत्रे नव्हती. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून उपनियंत्रक शिधावाटप विभाग, ठाणे यांच्या आदेशानुसार शिधावाटप अधिकारी श्री. सुभाष रामनाथ डुंबरे व त्यांच्या पथकाला तातडीने घटनास्थळी पाचारण करण्यात आले. या संयुक्त तपासणीत टँकरच्या ५ कप्प्यांमध्ये एकूण २५,००० लिटर बेकायदेशीर डिझेल सदृश पदार्थ आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये २४ लाख ५० हजार रुपये किमतीच्या २५,००० लिटर डिझेल सदृश पेट्रोलियम पदार्थाचा आणि २२ लाख रुपये किमतीच्या टाटा टँकरचा समावेश आहे. नियमानुसार तपासणी अधिकाऱ्यांनी घटनास्थळावरून रासायनिक चाचणीसाठी नमुने गोळा केले असून, टँकर व इतर मुद्देमाल पोलिसांच्या स्वाधीन केला आहे.

# लक्ष्मणराव भवरे यांचा राष्ट्रीय प्रेरणा पुरस्काराने गौरव

## इंदू मिल स्मारकाचे प्रणेते आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते नाशिकमध्ये सन्मान

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार देऊन नांदेड येथिल जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार लक्ष्मण भवरे कामारीकर यांचा गौरव करण्यात आला. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांचे वंशज तथा,त्यांचे नातू, इंदू मिल स्मारकाचे प्रणेते, रिपब्लिकन सेनेचे सरसेनापती आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते तसेच,रिपब्लिकन सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुशील सुर्यवंशी, राज्य प्रवक्ते अविनाश शिंदे, नाशिकच्या दै.महासागरचे वृत्त संपादक



सुधीर उमराळकर, निसर्गोपचार तज्ञ रावसाहेब घोडेस्वार,नाशिक मनपाच्या स्थायी समितीचे मा.सभापती संजय साबळे,दक्ष पोलीस टाईम्सचे संजय डोंगरे, भिमकन्या रिलस्टार आसावरी बर्वे आणि संयोजक तथा, संस्थेचे अध्यक्ष अनिल आठवले,सचिव मिलिंद कळवणकर,सुप्रसिद्ध निवेदिका तथा,पत्रकार आश्विनी पुरी आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी दि.२३ मे रोजी,समुद्र लॉन्स, नाशिक येथे ज्ञानदिप सामाजिक विकास संस्था महाराष्ट्र च्यावतिने देशभरात विविध क्षेत्रांत उल्लेखनिय कार्य करणाऱ्या मान्यवरांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.त्यात नांदेड जिल्ह्याचे सुपुत्र लक्ष्मण मारोती भवरे कामारीकर यांचा त्यांच्या सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात केलेल्या उत्तुग योगदानाबद्दल समावेश आहे. आपल्या लेखणीच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासीत जनसामान्यांचे प्रश्न परखडपणे प्रशासनासमोर मांडतांनाच भारतीय संविधानाचा प्रचार व प्रसार तसेच, वृक्षलागवड व संगोपन, पर्यावरणसमृद्धी आणि शैक्षणिक, सांस्कृतिक आदी क्षेत्रांसह सामाजिक कार्यातही त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग असतो.

नांदेड जिल्ह्यात पत्रकारिता क्षेत्रात व विविध सामाजिक संघटनात ते अग्रेसर असतात. त्यांच्या कार्य व कर्तव्यतत्परतेचा सन्मान म्हणून त्यांचा या पुरस्काराने गौरव करण्यात आला. लक्ष्मण भवरे यांना हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

**सर्वौच्च सन्मान - लक्ष्मण भवरे**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नांवे त्यांचे नातू आनंदराजजी आंबेडकर यांच्या हस्ते मिळालेला पुरस्कार आपण सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात आजपर्यंत केलेल्या कार्याचा सर्वौच्च सन्मान व आगामी काळात प्रेरणा असल्याचे मत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार प्राप्त लक्ष्मण भवरे यांनी व्यक्त केले.

## ACB च्या लाच प्रकरणाला नवे वळण

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

- 'त्या' महिला जात पडताळणीच्या उपायुक्त श्रीमती डॉ. छाया कुलाल यांना मुख्य आरोपी करण्याची मागणी
- फिर्यादीची उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा!

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नांदेड कार्यालयात गतवर्षी झालेल्या लाच प्रकरणातील तपास पारदर्शक करावा आणि समितीच्या उपायुक्त श्रीमती डॉ. छाया कुंडलिक कुलाल यांना या गुन्ह्यात मुख्य आरोपी करण्यात यावे, या मागणीसाठी फिर्यादी श्रीमती प्रज्ञा पंढरीनाथ घाडगे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (ACB) नांदेड पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले आहे. तपास योग्य दिशेने न झाल्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्याचा इशाराही त्यांनी या निवेदनातून दिला आहे. फिर्यादी श्रीमती प्रज्ञा घाडगे रा. वैशाली नगर, तरोडा बु., नांदेड यांनी आपल्या मुलाच्या जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी कार्यालयाकडून लाचेची मागणी होत असल्याबाबत दि २६ जून २०२५ रोजी एसीबीकडे तक्रार केली होती. त्यानुसार दि ३ जुलै २०२५ रोजी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कार्यालयात सापळा रचून विमानतळ पोलीस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ अन्वये गुन्हा (रजि. नं. २५५/२०२५) दाखल करण्यात आला होता. या कारवाईत प्रकल्प अधिकारी श्रीमती सुजाता मधुकर पोहरे यांना लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले होते.

श्रीमती प्रज्ञा घाडगे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की: लाचेची मागणी उपायुक्तांसाठीच: सापळा कारवाईदरम्यान पडताळणी केली असता, मुख्य आरोपी सुजाता पोहरे आणि संत रविदास आर्थिक महामंडळाच्या कर्मचारी सुरेखा कांबळे यांनी प्रत्यक्ष उपायुक्त डॉ. छाया कुलाल यांच्या दालनात जाऊन कामाची चर्चा केली होती. सुजाता पोहरे यांनी छाया कुलाल यांच्यासाठीच लाचेची मागणी केल्याचे तपासातून स्पष्ट होत आहे.

## न्यायिक अधिकाऱ्यांचा हृदयस्पर्शी निरोप समारंभ संपन्न

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

- न्यायाधीश आणि विधिज्ञ यांच्यातील सुसंवादावर मान्यवरांचा भर
- नांदेड अधिवक्ता संघाने घेतला प्रथमच नाविन्यपूर्ण व कौतुकास्पद कार्यक्रम



अधिवक्ता संघ नांदेडच्या वतीने नांदेड येथील बँक्वेट हॉल येथे दि २३ मे शनिवार रोजी नांदेड न्यायालयात मागील ३ वर्षांपासून कार्यरत असलेल्या आणि आता बदलीवर जात असलेल्या न्यायिक अधिकारी (न्यायाधीश) यांचा निरोप समारंभ व सुसंवाद कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.या कार्यक्रमाच्या माध्यमातून न्यायाधीश आणि विधिज्ञ यांच्यातील नाते अधिक दृढ करण्यावर मान्यवरांनी भर दिला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. एस.एन.हाके होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मा.न्यायाधीश टी.एस. सोलंकर हे उपस्थित होते.याप्रसंगी न्यायाधीश डॉ.एस.डी.तावशीकर, न्यायाधीश श्रीमती.आर.एम. शिंदे आणि न्यायाधीश एस.डी. इंदलकर यांचा सत्कारमूर्ती म्हणून गौरव करण्यात आला.याशिवाय न्यायाधीश बोराळकर आणि न्यायाधीश अमृत चव्हाण,मंडळाच्या न्यायाधिश मनीषा राठोड यांनीही या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती लावली.विचार मंचावर नांदेड जिल्हा अधिवक्ता संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. यदुपत शामसुंदरराव अर्धापूरकर, सचिव ॲड.कपिल पाटील,महिला उपाध्यक्ष ॲड.सुजाता बगाटे, उपाध्यक्ष ॲड.देलमाडे,ॲड. वाकोडे आदिंची प्रमुख उपस्थिती होती.या कार्यक्रमाची प्रस्तावना आणि उद्देश सागतांना अध्यक्ष ॲड. यदुपत अर्धापूरकर म्हणाले की, नांदेडमध्ये न्यायाधिशांना काम करण्यासाठी अत्यंत पोषक आणि चांगले वातावरण मिळते ज्यामुळे अपेक्षेपेक्षा जास्त प्रकरणांचा निकाल (डिस्पोजल) लागतो आणि न्यायाधीश व विधिज्ञ वर्गात सतत संवाद,सुसंवाद आणि चांगले संबंध रहावे या हेतूनेच या स्नेहसंमेलनांचे आयोजन करण्यात आले आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.ज्येष्ठ विधीज्ञांच्या भावना नांदेड जिल्ह्यातील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.पी.एन.शिंदे,ॲड.बी. आर.भोसले,ॲड.सय्यद अरिबुद्दीन, ॲड.व्यंकटेश पाटनुरकर,ॲड. रहमान सिद्दीकी आणि ॲड.संजय वाकोडे आदिंनी आपले मनोगत व्यक्त केले.विशेषतः न्या.तावशीकर यांच्या उत्कृष्ट कार्यशैलीचे सर्वांनी कौतुक केले आणि त्यांनी भविष्यात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश (पि. डि.जे.)आणि उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचे न्यायाधीश व्हावे अशी सदिच्छा सर्व विधीज्ञांनी यावेळी व्यक्त केली.न्यायाधीशांचे अनुभव आणि मार्गदर्शन निरोप घेणाऱ्या न्यायाधीशांनी नांदेडमधील आपल्या कामाच्या अनुभवाबद्दल गौरवोद्गार काढले ज्यामध्ये न्यायाधीश एस.डी. इंदलकर म्हणाले की,नांदेड मधील विधिज्ञ वर्गाची कार्यतत्परता खूप चांगली असल्यामुळे मी त्यांचे कौतुक करतो. कारण निकाल कोणताही लागो परंतु येथील ज्येष्ठ व कनिष्ठ विधिज्ञ कामात कधीही दिरंगाई करत नाहीत ही विशेष बाब त्यांनी अधोरेखित केली.

न्यायाधीश डॉ.एच.डी. तावशीकर म्हणाले की,नांदेड मधील माझा १ वर्षाचा काळ कधी व कसा संपला हे मला कळलेच नाही.येथील विधिज्ञ कायदेशीर बाबींमध्ये न्यायाधीशांच्या काही चुका होत असल्यास त्या स्पष्टपणे सांगण्याची हिंमत ठेवतात याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.कनिष्ठ व ज्येष्ठ विधिज्ञांकडून आपल्याला खूप काही शिकायला मिळाले मात्र न्यायाधीशांची संख्या अपुरी असल्यामुळे काही कामे प्रलंबित राहिल्याची खंतही त्यांनी मनोगतात व्यक्त केली.

## ऑनलाइन औषध विक्री बंद करण्याच्या मागणीला पाठींबा




भोकर : (स. गांवकरी)

- दुकाने बंद ठेवून विक्रेत्यांचा निषेध

देशभरात वाढत असलेल्या ऑनलाइन औषध विक्रीच्या विरोधात अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने दिलेल्या देशव्यापी बंदच्या हाकेला भोकर शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. औषध विक्रेत्यांनी दुकाने बंद ठेवून शासनाच्या धोरणांविरोधात निषेध नोंदवत आपल्या मागण्यांना पाठींबा दर्शविला. कोरोना महामारीच्या काळात सरकारने ऑनलाइन औषध विक्री व होम डिलिव्हरीसाठी विशेष शासन निर्णय (जी.आर.) जारी केला होता. मात्र कोरोनाचा प्रादुर्भाव संपुष्टात आल्यानंतरही तो निर्णय मागे घेण्यात आलेला नसल्याने ई-पोर्टल आणि इंटरनेट फार्मसीच्या माध्यमातून ऑनलाइन औषध विक्री सुरूच असल्याचा आरोप विक्रेत्यांनी केला आहे. यामुळे पारंपरिक औषध विक्री व्यवसायावर विपरीत परिणाम होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. यासंदर्भात संबंधित मंत्री व प्रशासकीय अधिकाऱ्यांना अनेक वेळा निवेदने देऊन तसेच प्रत्यक्ष भेटी घेऊन ऑनलाइन औषध विक्रीसंबंधीचे शासन निर्णय मागे घेण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र प्रशासनाकडून यावर कोणतीही ठोस भूमिका न घेतल्याने अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने बुधवार, दि. २० मे २०२६ रोजी देशव्यापी बंदची घोषणा केली होती. या आवाहनाला प्रतिसाद देत भोकरमधील सर्व औषध विक्रेत्यांनी दिवसभर दुकाने बंद ठेवून आंदोलनात सहभाग घेतला. मात्र बंदमुळे रुग्णांची गैरसोय होऊ नये आणि औषधांची उपलब्धता कायम राहावी यासाठी शहरातील पाच औषध दुकाने सुरू ठेवण्यात आली होती. दरम्यान, नांदेड जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने भोकरचे तहसीलदार विनोद गुंडमवार यांच्या मार्फत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच संबंधित विभागाच्या मंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनाही निवेदन देण्यात आले.

या निवेदनावर जिल्हाध्यक्ष शंतनू कोटगिरे, संजय मोटे, भोकर तालुकाध्यक्ष राजेश्वर रेड्डी लोकावाड यांच्यासह अनेक विक्रेत्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## बिबट्याचा धुमाकूळ; वासराचा बळी

श्रीगोंदा (स. गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथील उत्तर काकडेवाडीत बिबट्याने पुन्हा धुमाकूळ घालत शेतकरी राजेंद्र वसंत काकडे यांच्या गोठ्यावर हल्ला केला. या हल्ल्यात दुभती गाय थोडक्यात बचावली असली तरी वासराचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, यापूर्वीही राजेंद्र काकडे यांच्या गोठ्यावर बिबट्याने हल्ला करून गायीचा बळी घेतला होता. तसेच दोन वर्षांपूर्वी त्यांच्या उसाच्या शेतात बिबट्याची तीन पिल्ले आढळून आली होती. त्यावेळी वनविभागाने ती पिल्ले अन्यत्र हलवली होती. आता पुन्हा झालेल्या हल्ल्यामुळे ग्रामस्थांमध्ये चिंता वाढली आहे. घटनेची माहिती पत्रकार नंदकुमार कुरुमकर यांना मिळताच त्यांनी तात्काळ



वनविभागाच्या रेंज फॉरेस्ट ऑफिसर श्रीमती भगत यांच्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. त्यानंतर वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. लोणी व्यंकनाथ परिसरात अनेक वर्षांपासून बिबट्यांचा वावर असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. परिसरात बिबट्याचे ठसेही वारंवार आढळून येत आहेत. शेतीच्या सोयीसाठी अनेक शेतकरी वस्त्यांवर वास्तव्यास असून, त्यांच्या गोठ्यातील पाळीव जनावरांवर बिबट्यांकडून हल्ले होत आहेत. त्यामुळे रात्रीच्या वेळी शेतीची कामे करताना शेतकऱ्यांना जीव मुठीत धरून वावरावे लागत आहे.

# रेणापूर सुथा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मावेजा मागणीला आले तात्पुरते यश

भोकर : (स. गांवकरी)

- कार्यकारी अभियंता सी.आर. बनसोड यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे उपोषण मागे
- तर मुद्दतीत मागण्या पूर्ण न झाल्यास पुढे तीव्र आंदोलन करण्याचा आंदोलकांचा इशारा

तालुक्यातील रेणापूर सुधा बृ.ल.पा.तलाव प्रकल्पाची १.१० मीटर उंची वाढविण्याच्या कामासाठी ६ गावच्या शेतकऱ्यांची ३७.०७ हेक्टर अतिरिक्त जमिन भुसंपादित करण्यात आली.मुल्यमापनानुसर निश्चित केलेली एकूण रक्कम न देता सदरील भुसंपादित जमिन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या ७/१२ वरुन कमी करण्यात आली.परंतू अद्यापही उर्वरित ७० टक्के प्रलंबित मावेजाची रक्कम प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात आली नाही. तसेच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना शेताकडे जाण्यासाठीचा रस्ता व पुल ही बांधून देण्यात आला नाही. त्यामुळे प्रलंबित एकूण मावेजा त्वरीत द्यावा व रस्ता आणि पुल बांधून द्यावा यांसह आदी मागण्यांसाठी प्रकल्पग्रस्त शेतकरयांनी दि.१८ मे २०२६ रोजी पासून भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भोकर यांच्या कार्यालयासमोर अमरण उपोषण सुरु केले होते.रखरखत्या उन्हातील या उपोषणाची दखल घेऊन विष्णूपुरी प्रकल्प विभाग क्रं.-२,जि. नांदेडचे कार्यकारी अभियंता सी.आर. बनसोड यांनी उपोषणस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांच्या मागण्या दि.१० जून २०२६ पर्यंत पुर्ण करु,असे लेखी आश्वासन दिल्याने उपोषणकर्त्यांनी उपोषणाची सांगता केली. रेणापूर सुधा बृ.ल.पा.तलाव प्रकल्प ता.भोकर ची १.१० मीटर उंची वाढवण्यासाठी मौ.बोरगाव, किन्हाळा,थेरबन,बटाळा,रेणापूर व सोमठाण या एकूण ६ गावच्या शेतकऱ्यांची ३७.०७ हेक्टर अतिरिक्त जमिन भुसंपादीत करण्यात आली. सदरील भुसंपादित जमिनीची मुल्यमापन मावेजा रक्कम २३ कोटी ३४ लाख रुपये निश्चित करण्यात आली.परंतू ही रक्कम प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न देता उंची वाढविण्याचे काम मार्च २०२५ मध्ये सुरु करण्यात आले. यावेळी भुसंपादित जमिनीचा मावेजा प्रथम देण्यात यावा व नंतर काम सुरु करावे असा पावित्रा घेत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी लोकशाही मार्गाने आंदोलन सुरू केले होते. तसेच आपल्या न्याय हक्काच्या मागण्यांसाठी दि.९ जून २०२६ रोजी भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भोकर यांच्या कार्यालयासमोर कार्यकारी अभियंता, विष्णूपुरी प्रकल्प विभाग क्रं.-२,जि. नांदेड यांच्या विरोधात प्रकल्पग्रस्त शेतकरी उत्तम बाबळे यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी अमरण उपोषण सुरु केले होते.यावेळी एकूण मावेजापैकी ३० टक्के रक्कम प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना देण्याबाबत तत्कालीन कार्यकारी अभियंता प्र.र.मुदगल यांनी आश्वासित केले होते व जुलै २०२५ मध्ये ठरल्याप्रमाणे मावेजाची ७ कोटी ९७ लाख रुपये अर्थातच ३० टक्के रक्कम प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात आली.

मावेजाची ३० टक्के रक्कम देऊन जवळपास १० महिने होत आहेत. दरम्यानच्या काळात प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी उर्वरित प्रलंबित ७० टक्के मावेजाची एकूण १५ कोटी ३७ लाख रुपये रक्कम मिळावी यासाठी भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भोकर, कार्यकारी अभियंता,विष्णूपुरी प्रकल्प विभाग क्रं.-२,जि.नांदेड यांच्याकडे सातत्याने लेखी व तोंडी मागणी केली होती.मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात या प्रलंबित मावेजाविषयी १४ कोटी ३८ लक्ष रुपयांची तरतुदही केली .परंतू सदरील मागणीस संबंधित अधिकारी व पाटबंधारे विभाग प्रशासनाने प्रतिसाद न दिल्याने दुसऱ्यांदा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी प्रकल्पग्रस्त शेतकरी उत्तम बाबळे यांच्या नेतृत्वाखाली सोमवार, दि.१८ मे २०२६ रोजी पासून भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भोकर यांच्या कार्यालयासमोर रखरखत्या उन्हात अमरण उपोषण सुरु केले. सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या वतीने प्रातिनिधिक उपोषणकर्ते म्हणून नईमोद्दीन हमीदमिया शेख,बालाजी गणपत वनलवाड,प्रशांत श्रीराम शिवेवार,शंकर दत्ता नवटक्के, मोहमद रेहान अब्दुल अजीज कुरेशी यांसह आदींनी अमरण उपोषणात समावेश होता. याची दखल घेऊन अभियंता, विष्णूपुरी प्रकल्प विभाग क्रं.-२, जि.नांदेड चे कार्यकारी अभियंता सी.आर.बनसोड यांनी कार्यकारी संचालक,गोदावरी मराठावाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे उर्वरीत १५.३७ कोटी रुपये निधी तात्काळ मिळावा असे मागणीपत्र पाठविले. तसेच अधिक्षक अभियंता व सर्व संबंधितांना याविषयीची माहिती अवगत करुन दि.१९ मे २०२६ रोजी रात्री ८:३० वाजता भोकर येथील उपोषणस्थळी भेट दिली. यावेळी त्यांच्या समवेत उपविभागीय अभियंता अरुण किशनराव कलवले व सहाय्यक अभियंता श्रेणी -२ कृष्णा नामदेव राजकुंठवार, पो.नि.अजित कुंभार, पो.उप.नि.राम कराड, पो.ना. परमेश्वर गाडेकर, पो.ना.डी.जी.पवळे यांसह आदींची उपस्थिती होती.यावेळी कार्यकारी अभियंता सी.आर.बनसोड यांनी उपरोक्त सर्व मागण्यांविषयी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांशी सविस्तर चर्चा केली व दि.१० जून २०२६ पर्यंत सर्व मागण्या पूर्ण करु असे लेखी आश्वासन दिले.

आश्वासनपत्र उत्तम बाबळे यांना देण्यात आले व उपस्थित अधिकाऱ्यांच्या हस्ते उपोषणकर्त्यांना रस देऊन उपोषणाची सांगता करण्यात आली.तर प्रकल्पग्रस्त शेतकरी उत्तम बाबळे यांच्या नेतृत्वाखाली दुसऱ्यांदा करण्यात आलेले हे अमरण उपोषण यशस्वी करण्यासाठी प्रकल्पग्रस्त शेतकरी तानाजी शिवेवार,शंकर दत्ता नवटक्के,शेख नईमोद्दीन हमिदमियां,गोदावरीबाई नाईकवाडे, दत्ता नवटक्के,गणपत चिल्लेवार, प्रशांत शिवेवार, अ.रहिम अ.करीम, माधव देवकर, दिलीप सुर्यवंशी, शिवाजी हुबेवाड, समीउल्ला बेग अ. बेग, बालाजी वनलवाड, सुरेश आरकलवाड, नारायण आरकलवाड,साई पाटील गौड, संजय मुरगुलवार,मिर्झा तय्यब बेग,दत्ता देशमुख यांसह आदींनी परिश्रम घेतले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## दै. समर्थ गांवकरी पुणे शहर प्रतिनिधीपदी किशोर चौरे यांची नियुक्ती

पुणे (स. गांवकरी) : दैनिक समर्थ गांवकरी पुणे शहर प्रतिनिधीपदी ज्येष्ठ पत्रकार किशोर चौरे यांची आज नियुक्ती करण्यात आली. पत्रकारिता क्षेत्रातील त्यांचा अनुभव, कार्यतत्परता आणि समाजातील विविध प्रश्नांवर सातत्याने केलेले काम लक्षात घेऊन त्यांची या महत्त्वाच्या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. दैनिक समर्थ गांवकरीचे समूह संपादक शेठ नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या सूचनेनुसार किशोर चौरे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, जुन्नर तालुका प्रतिनिधी रवींद्र भोर तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे सीनियर जर्नालिस्ट राजेश डोके उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी किशोर चौरे यांना नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या पुढील पत्रकारितेच्या वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या. दैनिक समर्थ गांवकरीच्या माध्यमातून पुणे शहरातील विविध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि जनहिताच्या प्रश्नांना अधिक प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी ते कार्यरत राहतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. नियुक्तीनंतर किशोर चौरे यांचे पत्रकारिता क्षेत्रातील सहकारी, मित्रपरिवार तसेच विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.



## देवाचे दानपेटीतील रक्कमे वर सेवकाचाच डल्ला; सेवकास अटक

आळंदी (स. गांवकरी) : तीर्थक्षेत्र आळंदीतील श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या मंदिरात एका सेवकानेच दानपेटीतील पैशांवर डल्ला मारल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मंदिरातील दानपेटीतून पैसे काढून ते कॅशियर रूममध्ये जमा करण्याची जबाबदारी असताना, आरोपीने तब्बल तीन दिवस नजर चुकावून १५ हजार रुपयांची रोकड चोरून नेली. या प्रकरणी आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीला तात्काळ अटक केली आहे. विशाल बाळू वारुळे ( वय ३३ वर्षे, रा. फ्लॅट नं. २०६, कार्तिकी हाईट्स, चोविसावाडी, ता. हवेली, जि. पुणे, मूळ गाव- वारूळवाडी, नारायणगाव, ता. जुन्नर ) असे अटक करण्यात आलेल्या आरोपी सेवकाचे नाव आहे. या प्रकरणी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अधिक तपास आळंदी पोलिस करीत आहे.

## नांदेड विधान परिषदेसाठी महाविकास आघाडीतून राहुल नाईक इच्छुक



किनवट (स. गांवकरी) : येणाऱ्या नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीचे वारे वाहू लागले असून, महाविकास आघाडीच्या गोटातून आता नवी नावे समोर येऊ लागली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते तथा कृषी उत्पन्न समितीचे उपसभापती राहुल नाईक यांनी या निवडणुकीसाठी आपली प्रबळ दावेदारी स्पष्ट केली आहे. "पक्षाने आणि महाविकास आघाडीने संधी दिल्यास विधान परिषद निवडणूक लढवण्यास आपण सज्ज आहोत," असे सूचक विधान नाईक यांनी केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून नांदेडच्या राजकारणात आणि समाजकारणात सक्रिय असलेले राहुल नाईक यांनी आपल्या कार्यशैलीने तरुणांची मोठी फळी निर्माण केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गणितात त्यांची पकड मजबूत मानली जाते. सध्याच्या बदलत्या राजकीय परिस्थितीत महाविकास आघाडीने एका तरुण आणि अभ्यासू चेहऱ्याला संधी द्यावी, अशी मागणी कार्यकर्त्यांकडून जोर धरत होती. > यावेळी बोलताना राहुल नाईक म्हणाले की, "आम्ही सतत जनतेच्या संपर्कात असून स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यांच्या अडीअडचणींची आम्हाला जाणीव आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेतृत्व आणि महाविकास आघाडीने विश्वास दाखवल्यास, आम्ही पूर्ण ताकदीने मैदानात उतरू. किनवट-माहूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार तथा आमचे प्रेरणास्थान कै. स्वर्गीय प्रदिपजी नाईक साहेब व आमच्या नेत्या बेबिताई प्रदीप नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही ही निवडणूक लढविण्यास सज्ज आहोत.

# भारत संरक्षण उत्पादनाचा सर्वात मोठा निर्यातदार बनेल!

### शिर्डीत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

शिर्डी : (स. गांवकरी)

संरक्षण क्षेत्रात खासगी उद्योगांची गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या कंपन्यांकडून होणारे संशोधन हे संरक्षण क्षेत्रातील उत्पादनांना अधिक मजबूत करीत असल्याने केंद्र सरकारनेही खासगी उद्योगांना पाठबळ देऊन सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे. खासगी उद्योगाचे सामर्थ्य जेवढे वाढेल तेवढी सुरक्षा अधिक मजबूत होईल. यातून भारत देश संरक्षण उत्पादनाचा सर्वात मोठा निर्यातदार बनेल, असा विश्वास केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केला.

शिर्डी येथील औद्योगिक वसाहतीमध्ये 'निबे उद्योग समूहा'च्या वतीने विकसित करण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन आणि सीएनजी प्रकल्पाचे उद्‌घाटन केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमास भारताचे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान, सभापती राम शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, लेफ्टनंट जनरल संदीप जैन, अनुप सिंघल, डीआरडीओचे सेक्रेंटरी डॉ.समीर कामत, केंद्रीय सचिव संजीव कुमार, ब्रह्मविहारीजी महाराज, आ.राणाजगजितसिंह, आ.मोनिका राजळे, आ. विक्रमसिंह पाचपुते, आ.आशुतोष काळे, आ.अक्षय कर्डिले यांच्यासह संरक्षण आणि उद्योग विभागाचे अधिकारी आणि प्रकल्पाचे प्रवर्तक गणेश निबे उपस्थित होते. आपल्या भाषणात गणेश निबे यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरवपूर्ण उल्लेख करून मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, "येथे



आल्यानंतर या प्रकल्पाचे महत्त्व आपल्याला समजले. भारतामध्ये बुद्धिमत्तेची कमतरता नाही. असलेल्या साधनांचा उपयोग करून, बुद्धिमत्तेच्या जोरावर भारत देशाला निर्यातदार होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही." हे स्पष्ट करून त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राची भूमी ही छत्रपती शिवाजी महाराजांची आहे. सुशासन आणि स्वाभिमानाचा संदेश त्यांनी आपल्याला दिला. आत्मनिर्भर अर्थव्यवस्थेचे मॉडेल शिवाजी महाराजांनी निर्माण करून दाखविले. लढाईसाठी लागणारे साहित्यही त्यांनी स्थानिकांकडून बनवून नवे साम्राज्य उभे करून दाखविले. हीच भूमिका लोकमान्य टिळकांची होती. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" हा संदेश देणाऱ्या या महाराष्ट्राच्या भूमीने आता संरक्षण व्यवस्थेतही खासगी उद्योगांच्या माध्यमातून एक नवा विश्वास निर्माण केला आहे.

संरक्षण उद्योग मजबूत होण्यासाठी खासगी उद्योगाला केंद्र सरकारने पाठबळ देण्याचे धोरण घेतले आहे. यामुळे धोरणात्मक सुधारणा होत असून थेट परकीय गुंतवणुकीसही प्रोत्साहन मिळत आहे. परवाना प्रक्रियेचे सुलभीकरण आणि स्वदेशी नीतीला चालना मिळत असल्यामुळेच खासगी उद्योग समूहांचा सहभाग संरक्षण उत्पादनामध्ये चांगल्या पद्धतीने वाढला आहे. हा वाटा आता २५ ते ३० टक्क्यांवर पोहोचला असल्याचे त्यांनी सांगितले. आधुनिक तंत्रज्ञान आणि बुद्धिमत्तेचा वापर करून, खासगी उद्योग समूह करीत असलेली वाटचाल ही ऊर्जा निर्माण करणारी असून, यातूनच विकासाचा रोडमॅप तयार होत आहे. निबे उद्योग समूह यासाठीचे मोठे उदाहरण असून, या उद्योग समूहातून निर्माण होणारे संरक्षण साहित्याचे उत्पादन पाहता हा उद्योग समूह देशासाठी अनेक वर्षांचा माईलस्टोन ठरेल.

भारताचे सामर्थ्य हे आता शिर्डीच्या भूमीतूनही सिद्ध होणार आहे. हा उद्योग केवळ उत्पादनासाठी मर्यादित नाही, तर यातून अर्थव्यवस्था मजबूत होईलच, पण औद्योगिक स्थिरताही मिळेल. अनेक खासगी कंपन्या आता संरक्षण उत्पादनामध्ये भागीदारी करण्यासाठी पुढे येत असल्यामुळे एक 'इको सिस्टिम' निर्माण होत असून, संरक्षण उद्योगही मजबुतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. 'ऑपरेशन सिंदुर मध्ये भारताने आपले सामर्थ्य सिद्ध करून दाखविले आहे. भविष्यातही खासगी क्षेत्राच्या माध्यमातून संरक्षण उत्पादनाची निर्मिती चांगल्या पद्धतीने होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "आजचा दिवस देशाकरिता ऐतिहासिक असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' हे जे संदेश दिले होते, ते संरक्षण क्षेत्राने प्रत्यक्षात अमलात आणले आहेत. त्यामुळे देश आता स्वदेशी पद्धतीने बनविलेल्या उत्पादनांचा निर्यातदार बनला आहे."

## महेश्वर मल्टीस्टेटच्या विसापूर शाखेच्या कार्यालयाचे उद्‌घाटन



श्रीगोंदा : (स. गांवकरी)

महेश्वर मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. काष्टी यांच्या विसापूर शाखेच्या नवीन अद्ययावत कार्यालयाचे उद्‌घाटन रविवार दि. २४ मे २०२६ रोजी उत्साहात पार पडले. महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती मा. ना. प्रा. श्री. राम शिंदे यांच्या शुभहस्ते उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी बोलताना राम शिंदे यांनी ग्रामीण भागात प्रभावीपणे कार्य करत सर्वसामान्य नागरिक, शेतकरी व व्यावसायिकांना महेश्वर मल्टीस्टेटने नेहमीच मदतीचा हात दिल्याचे सांगितले. ठेवीदारांचा विश्वास आणि संस्थेची सेवाभावी वृत्ती यामुळे संस्था भविष्यात निश्चितच नवीन उंची गाठेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी कॅबिनेट मंत्री तथा आमदार मा. श्री. बबनदादा पाचपुते हे होते. त्यांनीही विसापूर शाखेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. या कार्यक्रमास श्रीगोंदा तालुका व जिल्ह्यातील विविध पदाधिकारी, संस्थेचे सभासद, ठेवीदार, कर्जदार तसेच हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाची शोभा अधिक वाढली. कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या सर्व मान्यवर व नागरिकांचे महेश्वर परिवाराच्या वतीने आभार मानण्यात आले.

## दहावी, बारावी आश्रमशाळा निकालात मुलींची बाजी

अकोले : (स. गांवकरी)

राजूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शासकीय व निमशासकीय आश्रमशाळांनी दहावी व बारावीच्या निकालात उल्लेखनीय यश संपादन केले असून यंदाच्या निकालात मुलींनी विशेष चमक दाखवली आहे. राजूर प्रकल्पातील इयत्ता दहावीच्या १७ शाळांचा, तर बारावीच्या २ शाळांचा शंभर टक्के निकाल लागला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राजूर आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत २१ शासकीय व १६ अनुदानित आश्रमशाळांचा मार्च २०२६ मधील दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यामध्ये शासकीय आश्रमशाळांचा सरासरी निकाल ९६.३२ टक्के, तर अनुदानित आश्रमशाळांचा सरासरी निकाल ९०.९५ टक्के लागला आहे. २१ शासकीय आश्रमशाळांपैकी १३ शाळांचा, तर १६ अनुदानित आश्रमशाळांपैकी ४ शाळांचा शंभर



टक्के निकाल लागला आहे.

दहावी परीक्षेत अनुदानित आश्रमशाळा देवठाण येथील पूजा चंद्रकांत खोकले हिने ४४८ गुण (८९.६० टक्के) मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. शासकीय आदर्श आश्रमशाळा मवेशी येथील तेजल रामनाथ बांबळे हिने ४४४ गुण (८८.८० टक्के) मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला, तर शासकीय आश्रमशाळा कोहणे येथील प्रणिता विठ्ठल दिघे हिने ४४१ गुण (८६.२० टक्के) मिळवत तृतीय क्रमांक मिळविला.

दरम्यान, फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी बोर्ड परीक्षेत ५ शासकीय व ३ अनुदानित आश्रमशाळांचा निकालही उल्लेखनीय लागला आहे. शासकीय आश्रमशाळांच्या कला शाखेचा सरासरी निकाल ९४.८९ टक्के, तर विज्ञान शाखेचा निकाल ९९.४६ टक्के लागला आहे. अनुदानित आश्रमशाळांच्या कला शाखेचा सरासरी निकाल ८७.८८ टक्के, तर विज्ञान शाखेचा निकाल ९२.५९ टक्के लागला आहे. ५ शासकीय आश्रमशाळांपैकी २ शाळांचा शंभर टक्के निकाल लागला आहे.

बारावी कला शाखेत शासकीय आश्रमशाळा पैठण येथील अक्षदा श्रीधर कडाळी हिने ५१९ गुण (८६.५० टक्के) मिळवत प्रथम क्रमांक मिळविला. त्याच शाळेतील कीर्ती गणेश धराडे हिने ५०१ गुण (८३.५० टक्के) मिळवत द्वितीय, तर मंगल सुरेश कोंडार हिने ४९० गुण (८१.६७ टक्के) मिळवत तृतीय क्रमांक पटकावला.

विज्ञान शाखेत शासकीय आश्रमशाळा केळीरुम्हणवाडी येथील गायत्री शिवाजी गोडे हिने ३९८ गुण (६६.३३ टक्के) मिळवत प्रथम क्रमांक मिळविला. शासकीय आश्रमशाळा पैठण येथील निशा विठ्ठल बोटे हिने ३८५ गुण (६४.१७ टक्के) मिळवत द्वितीय, तर शोभा पांडुरंग तांबे हिने ३७५ गुण (६२.५० टक्के) मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्या आयुक्त श्रीमती लिना बनसोड, अपर आयुक्त श्री दिनकर पावरा तसेच राजूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी श्रीमती देवकन्या बोकडे यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## कांद्याला भाव नाही; शेतकऱ्यांचा उद्रेक : संतप्त आंदोलन

नाशिक : (स. गांवकरी)

नाशिक जिल्ह्यासह कळवण तालुक्यात कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून, अखेर या संतापाचा उद्रेक कळवणमध्ये रस्त्यावर पाहायला मिळाला. कांद्याला कवडीमोल दर मिळत असल्याने आणि व्यापाऱ्यांकडून खरेदीस नकार दिला जात असल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी कळवण बसस्थानकासमोर रस्त्यावर कांदा फेकून तीव्र आंदोलन करत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

"शेतकऱ्यांनी वर्षभर घाम गाळायचा आणि शेवटी कांदा कवडीमोल दराने विकायचा का?" असा संतप्त सवाल उपस्थित करत शेतकऱ्यांनी प्रशासनाला जाब विचारला. एका बाजूला खत, बियाणे, औषधे, मजुरी आणि वाहतुकीचा खर्च प्रचंड वाढलेला असताना दुसऱ्या बाजूला कांद्याला योग्य भाव मिळत नसल्याने

### सरकारच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी



शेतकरी आर्थिक संकटाच्या खाईत ढकलला जात असल्याची भावना आंदोलकांनी व्यक्त केली.

सध्या बाजारात कांद्याचे दर अक्षरशः कोसळले असून अनेक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही निघत नाही. काही ठिकाणी व्यापाऱ्यांकडून शेतमाल खरेदी करण्यास टाळाटाळ केली जात असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. "कर्ज काढून पीक घेतले, पण माल विकायलाच बाजार नाही; मग शेतकऱ्यांनी जगायचं कसं?" असा प्रश्न आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला.

आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांनी तहसीलदारांना निवेदन देत सरकारने तातडीने कांद्याला हमीभाव जाहीर करावा, कांदा निर्यातबंदीवरील निर्बंध हटवावेत, शेतकऱ्यांना प्रति क्विंटल अनुदान द्यावे तसेच बाजार समित्यांमध्ये तातडीने खरेदी सुरू करण्याची मागणी केली. पोलिस बंदोबस्तात आंदोलन पार पडले असून प्रशासनाने निवेदन स्वीकारून वरिष्ठ स्तरावर मागण्या पाठविण्याचे आश्वासन दिले. आज परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की, शेतकरी पीक घेतो; मात्र बाजारभावाचा सर्वाधिक फटका त्यालाच बसतो. उत्पादन वाढले की भाव पडतात आणि उत्पादन कमी झाले की ग्राहकांवर महागाईचा भार येतो. या दुष्टचक्रात सर्वाधिक भरडला जातो तो अन्नदाता शेतकरी. शासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता दीर्घकालीन धोरण आखून शेतमालाला स्थिर बाजारपेठ उपलब्ध करून देणे, साठवणूक व्यवस्था मजबूत करणे आणि शेतकऱ्यांना न्याय्य भाव मिळेल यासाठी ठोस उपाययोजना करणे काळाची गरज बनली आहे.

कळवणमधील हे आंदोलन केवळ कांद्यापुरते मर्यादित नसून, राज्यातील शेतकऱ्यांच्या वेदना, असंतोष आणि वाढत्या आर्थिक असुरक्षिततेचे तीव्र प्रतीक असल्याचे बोलले जात आहे. "आमच्या घामाला भाव द्या, नाहीतर संघर्ष आणखी तीव्र होईल," असा इशाराच आंदोलक शेतकऱ्यांनी दिला.

## रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिक संतप्त

देगलूर : (स. गांवकरी)

- दुरुस्ती न झाल्यास सार्वजनिक बांधकाम विभागासमोर आमरण उपोषणाचा इशारा

मुखेड तालुक्यातील सावरमाळ, सावळी ते मरखेल तसेच सावळी ते मष्णेर या प्रमुख मार्गांची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने नागरिक, विद्यार्थी आणि रुग्णांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. वारंवार निवेदने देऊनही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने संतप्त नागरिकांनी आता सार्वजनिक बांधकाम विभागासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत काळे बेन्नाळखर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन सादर केले आहे. यापूर्वीही १५ डिसेंबर २०२५, १९ डिसेंबर २०२५ व २६ डिसेंबर २०२५ रोजी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदने देण्यात आली होती. त्यावेळी काम तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र आजपर्यंत ना रस्ता दुरुस्ती झाली ना डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले. सावरमाळ येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असल्यामुळे सावळी व बेन्नाळ परिसरातील रुग्णांना उपचारासाठी या मार्गाने ये-जा करावी लागते. खराब रस्त्यामुळे गर्भवती महिला व गंभीर रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे नागरिकांनी सांगितले. तसेच सावळी ते मष्णेर मार्गावर हिंदू धर्मियांचे प्रसिद्ध देवस्थान असल्याने तेलंगणा, कर्नाटक आणि महाराष्ट्रातून भाविक मोठ्या संख्येने येत असतात. मात्र रस्त्याची बिकट अवस्था आणि अर्धवट सोडलेले डांबरीकरण यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. मरखेल येथे विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध असल्याने परिसरातील विद्यार्थी दररोज शिक्षणासाठी ये-जा करतात. मात्र रस्त्याच्या दुरवस्थेमुळे एस.टी. बससेवाही प्रभावित झाली असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनावर त्याचा परिणाम होत आहे.

## आदिवासी मन्नेरवारलू समाजाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रित येणे गरजेचे : लक्ष्मणराव ठक्करवाड

किनवट : (स. गांवकरी)

राष्ट्रीय आदिवासी मन्नेरवारलू महासंघाच्या माध्यमातून समाज बांधवांनी एकत्रित येऊन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्याची गरज असून, समाजहितासाठी हेवेदावे व गटतट विसरून एकसंघ होणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय आदिवासी मन्नेरवारलू महासंघाचे अध्यक्ष लक्ष्मणराव ठक्करवाड यांनी केले. किनवट येथे दि. २१ मे २०२६ रोजी आयोजित समाज संवाद बैठकीत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. राष्ट्रीय आदिवासी मन्नेरवारलू महासंघाच्या वतीने राज्यभर सामाजिक संवाद बैठकींचे आयोजन करण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून नांदेड जिल्ह्यात तालुकानिहाय बैठका आयोजित



करण्यात आल्या आहेत. या बैठकीस महासंघाचे राष्ट्रीय सचिव सुरेश अंबुलगेकर, कोषाध्यक्ष नामदेवराव मिठेवाड, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता मोहनराव गोपुलवाड, बाबुराव पुजरवाड, दिलीपराव बास्टेवाड, मधुकर उन्हाळे आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सचिव सुरेश अंबुलगेकर यांनी समाजासमोरील ज्वलंत प्रश्न, विविध स्तरांवर होत असलेला अन्याय आणि समाज संघटनात्मक बळकटीची आवश्यकता यावर सविस्तर मार्गदर्शन केले. समाजातील अंतर्गत मतभेद बाजूला ठेवून समाजाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. बैठकीत किनवट तालुक्यातील विविध गावांतील प्रतिनिधी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी राष्ट्रीय आदिवासी मन्नेरवारलू महासंघाच्या कार्यावर विश्वास व्यक्त करत संघटनेच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला.


### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर–आंबेगाव यांचे कोर्टात...**

क्र. फौज जन्म–मृत्यु/एसआर ९०/२५ दिनांक : १९/५/२०२६

नोटीस

**श्रीम. अनिता दगडू शिंदे, रा. बल्लाळवाडी, ता. जुन्नर जि. पुणे – अपिलार्थी**

**विरुद्ध...... निबंधक , जन्म –मृत्यू नोंदणी अधिकारी – प्रतिवादी**

**ग्राम अधिकारी / मुख्याधिकारी, ग्रामपंचायत बल्लाळवाडी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार श्रीम अनिता दगडू शिंदे रा बल्लाळवाडी ता जुन्नर जि पुणे यांची अर्जदार नामे **अनिता दगडू शिंदे** यांचा **जन्म १०.४.१९८३** रोजी **मौजे बल्लाळवाडी**, ता. जुन्नर जि.पुणे येथे झालेला आहे. यांचा जन्म नोंदीचा हुकूम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं.९०/२५ दिनांक ८.७.२०२५ रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दि.१९/५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर– आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**



महाराष्ट्र शासन

### सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर

ई– निविदा सुचना क्र. ०१ सन २०२६–२७

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रुपये | कामाची अंदाजित किंमत रुपये अक्षरी |
|---|---|---|---|
| १ | मौजे चोंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करणे. (मुख्य मंडप, स्टेज बांधणे, आसन व्यवस्था करणे, ग्रीन रुम्स, प्रसाधनगृह, बॅरकेटिंग व विद्युतकरण, ध्वनीक्षेपण यंत्रणा, वातानुकुलीन यंत्रणा, विद्युत जनित्र बॅकअप, सी.सी. टी.व्ही व्यवस्था, अग्निशामन यंत्रणा इत्यादी व इतर अनुषंगिक कामे करणे, तसेच साईड मंडप (तयार करणे.) ता.जामखेड, जि.अहिल्यानगर. | रु. ६४.०० लाख | रु. चौसष्ठ लाख मात्र |

**निविदेचे वेळापत्रक**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ई निविदा उपलब्ध कालावधी | : | दि.२३/०५/२०२६ ते २७/०५/२०२६ |
| २. | निविदा उघडणे | : | दि. २७/५/२०२६ कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अहिल्यानगर यांचे कार्यालयात |

सविस्तर निविदा सुचना व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

The Details of Works Provided in the Websites as below..

1. www.mahapwd.com... 2. https://mahatenders.gov.in

१. सदर कामाच्या सर्व किंवा एक निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१) कामाची मुदत ३ दिवस..

२) जिल्हा प्रशासनाचे ऐनवेळेच्या सुचनेनुसार व कामाचे वस्तुनिष्ठ आवश्यकतेनुसार सर्वकषपणे काम पुर्ण करणे बंधनकारक आहे. आवश्यक कागदपत्रे As per NIT

**कार्यकारी अभियंता**
सार्वजनिक बांधकाम विभाग अहिल्यानगर

# सिमेंटने भरलेला ट्रक अनियंत्रित होऊन कारला धडक

**डांग (गुजरात) : (स. गांवकरी)**

डांग जिल्ह्यातील सापुतारा-शामगहान राष्ट्रीय महामार्गावरील मालेगाव टोल बूथजवळ आज सिमेंटच्या पत्र्यांचा माल भरलेला एक ट्रक अनियंत्रित होऊन ट्रॅक्टर आणि कारला धडक दिल्याने गंभीर अपघात झाला. या अपघातात एकूण ९ जण किरकोळ व गंभीर जखमी झाले असून, घटनास्थळी काही काळ गोंधळ आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील नाशिकहून सिमेंटच्या पत्र्यांचा माल घेऊन वांसदाकडे जाणारा ट्रक क्रमांक



MH-12-TV-8917 मालेगाव टोल बूथजवळून जात असताना गावातून माती भरून येणाऱ्या ट्रॅक्टर क्रमांक GJ-30-A-5452 ला जोरदार धडक दिली. धडकेमुळे ट्रॅक्टर आणि ट्रॉलीचा चुराडा झाला असून ट्रॉली वेगळी होऊन रस्त्याच्या कडेला जाऊन पडली. यानंतर ट्रक आणखी बेकाबू होऊन समोरून येणाऱ्या सुरत जिल्ह्यातील ओलपाड येथील पर्यटकांच्या कार क्रमांक GJ-16-FB-0478 वर जाऊन आदळला. ट्रकने कारला दूरपर्यंत ओढत नेल्याने घटनास्थळी एकच खळबळ उडाली. कारमध्ये एकाच कुटुंबातील सदस्य प्रवास करत होते. सुदैवाने त्यांचा जीव थोडक्यात बचावला, मात्र अपघातामुळे सर्वजण घाबरून गेले होते. अपघातादरम्यान ट्रकने टोल प्लाझाजवळील डिव्हायडर आणि दगडांनाही नुकसान पोहोचवले. या घटनेत ट्रॅक्टर चालक गंभीर जखमी झाला असून कारमधील ६ पर्यटकांना किरकोळ दुखापती झाल्या आहेत. तसेच ट्रक चालक आणि क्लिनरलाही किरकोळ दुखापत झाली आहे. सर्व जखमींना १०८ ॲम्ब्युलन्सद्वारे शामगहान सीएचसी येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. या अपघातामुळे कार आणि ट्रॅक्टरचे मोठे नुकसान झाले असून ट्रकमधील सिमेंटचे पत्रे तुटल्याने लाखोंचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेनंतर मालेगाव टोल बूथ परिसरात काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. घटनेची माहिती मिळताच सापुतारा पोलीस ठाण्याचे पीआय के.बी. शांखला आणि पोलीस पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले व वाहतूक सुरळीत केली. सध्या सापुतारा पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.



ठाणे : दिवा शिवसेना उपशहरप्रमुख तथा नगरसेवक शैलेश मनोहर पाटील आयोजित शिवसेना मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयात जेष्ठ नागरिकांसाठी आयुष्यमान भारत कार्ड व जेष्ठ नागरिक कार्ड दोन दिवशीय शिबीर आयोजित करण्यात आले होते प्रसंगी सदर शेकडो जेष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला होता आज सदर नागरिकांना आयुष्यमान भारत कार्ड व जेष्ठ नागरिक कार्ड वाटप करण्यात आले. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### देवाच्या दानपेटीतील रक्कम चोरी करणाऱ्या सेवकास अटक

खोडद (स. गांवकरी) : तीर्थक्षेत्र आळंदीतील श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या मंदिरात एका सेवकानेच दानपेटीतील पैशांवर डल्ला मारल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मंदिरातील दानपेटीतून पैसे काढून ते कॅशियर रूममध्ये जमा करण्याची जबाबदारी असताना, आरोपीने तब्बल तीन महिन्यांत पावणे चार लाख रुपयांची रोकड रक्कम चोरून नेली. या प्रकरणी आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीला तात्काळ अटक केली आहे. विशाल बाळू वारुळे ( वय ३३ वर्षे, रा. फ्लॅट नं. २०६, कार्तिकी हाईट्स, चोविसावाडी, ता. हवेली, जि. पुणे, मूळ गाव- वारूळवाडी, नारायणगाव, ता. जुन्नर ) असे अटक करण्यात आलेल्या आरोपी सेवकाचे नाव आहे. या प्रकरणी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अधिक तपास आळंदी पोलिस करीत आहे.

### हॉटेल मालकासह दोघांना मारहाण हॉटेलमधील सामानाची नासधूस

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील करंजाळे (ता. जुन्नर) येथे एका हॉटेल मालक आणि त्याच्या कुटुंबातील सदस्यांना मारहाण करण्यात आल्याचा गंभीर प्रकार घडला आहे. याप्रकरणी रणजीत रवींद्र शिंदे (वय ३०, रा. करंजाळे, ता. जुन्नर) यांनी ओतूर पोलिसांत फिर्याद दिली असून फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवारी (दि.२२) दुपारी दोनच्या सुमारास हा प्रकार घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे शुक्रवारी दुपारी दोनच्या सुमारास त्यांचे 'हॉटेल लेक' मध्ये भाऊ व आई सोबत काम करीत असताना तिथे महेंद्र पोपट गायकवाड, शैलेश जगन्नाथ गायकवाड, राजू गायकवाड (रा. सितेवाडी, ता. जुन्नर) आणि इतर तीन जण (नाव, पत्ता माहित नाही) हे आले. त्यांनी 'आम्हाला गौतम लोखंडे यांना मारता काय, तुम्हाला दाखवतो काय असते ते' असे म्हणत फिर्यादी हॉटेल मालक आणि त्यांचे भाऊ, आई यांना काठी व दांडक्याने, लाथा बुक्क्यांनी मारहाण व शिवीगाळ केली. तसेच रॉड व चाकूचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली. सोबतच हॉटेलमधील सामानाचे नुकसान केल, असे फिर्यादीत नमूद आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास ओतूर ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस हवालदार भारती भवारी करत आहेत.

### बालविवाह रोखला; पोलीस व बालविवाह प्रतिबंध कायद्यांतर्गत कारवाई

संगमनेर खुर्द (स. गांवकरी) : संगमनेर तालुक्यातील निमगाव बु, येथे पोलीस प्रशासनाच्या वतीने बालविवाह प्रतिबंध कायद्या अंतर्गत गुप्त खबरीच्या माहितीवरून बालविवाह रोखण्यात आला असल्याची घटना घडली आहे. दिनांक २४ मे रोजी सकाळी ९:१५ सुमारास गुप्त माहितीच्या आधारे पोलीस प्रशासनाला गुप्त माहिती प्राप्त झाल्याने तातडीने पोलीसानी निमगाव पागा येथे धाव घेऊन निमगाव पागा येथील अजय शिवाजी भोरुडे यांच्या वस्तीवर , त्यांची भाची (वय १४ वर्ष ,२ महिने ) राहणार कसारवाडी ता. संगमनेर , व कोपरगाव तालुक्यातील सावळेविहीर येथील नवरदेव यांच्या विवाह सोहळ्याची जय्यत तयारी सुरू असताना हा बालविवाह प्रतिबंध कायद्यांतर्गत थांबविण्यात आला. पोलीस प्रशासाने बालविवाह प्रतिबंध कायद्यांतर्गत बोरुडे कुटुंबियांना या कायद्याची सर्व माहिती देऊन हा बालविवाह थांबवण्यास सांगितले भोरुडे कुटुंबियांनी देखील दिलगिरी व्यक्त करत संपूर्ण मंडप काढून टाकला, तसेच लग्नाचे साहित्य, वाजंत्री , नवरदेवाकडील वराडी ,यांना हा शुभ विवाह सोहळा थांबवण्यात आल्याचे जाहीर केले. यावेळी संगमनेर तालुका पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक विकास काळे, पोलीस हेड कॉन्स्टेबल ए.एम.महाजन, कॉन्स्टेबल बाबासाहेब शिरसाट, निमगाव बु, चे कामगार पोलीस पाटील राजेंद्र कानवडे ,सरपंच सोमनाथ कानवडे, ग्रामविकास अधिकारी धुमाळ,(उपस्थित नव्हते त्यांच्या सूचनेवरून) सुनील सोनवणे आदींसह निमगाव बु, ग्रामस्थ उपस्थित होते.

### एकदिवसीय रमाई साहित्य संमेलनाचे ३० मे रोजी आयोजन

पुणे (स. गांवकरी) : महामाता रमाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या वतीने महामाता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या ९१ व्या स्मृतिदिनानिमित्त तसेच स्मारकाच्या ८ व्या वर्धापन दिनानिमित्त शनिवार, दि. ३० मे २०२६ रोजी एकदिवसीय ‘रमाई साहित्य संमेलन’ आयोजित करण्यात आले असून या संमेलनाच्या अध्यक्षपदी विद्रोही कवयित्री,लेखिका, व्याख्याती,अभिनेत्री रमणी सोनवणे यांची निवड करण्यात आल्याची माहिती या संमेलनाचे मुख्य समन्वयक विठ्ठल गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी ॲड. नितीन घोडके, ॲड. क्षितिज खरात, संजोग कांबळे, माजी नगरसेविका लाताताई राजगुरू, श्रीमंत कोतले आदि मान्यवर उपस्थित होते. संमेलनाची अधिक माहिती देताना विठ्ठल गायकवाड म्हणाले, कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रमाई आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून होईल. त्यानंतर सर्वधर्म प्रतिनिधींच्या उपस्थितीत वाडिया कॉलेज शेजारील रमाई राष्ट्रीय स्मारक येथे उद्घाटन समारंभ पार पडणार आहे.

# श्रीमद भागवत कथा सोहळ्यात पुष्पवृष्टी करून श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा

## किती सांगू मी सांगू कुणाला, आज आनंदी आनंद झाला च्या गीतावर बालवारकऱ्यांसह भाविकांनी धरला ठेका

**नेवासा : (स. गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हयातील नेवासा तालुक्यातील श्री गुरुदेव दत्त पीठ श्री क्षेत्र देवगड येथील ज्ञानसागर मंडपामध्ये राष्ट्रसंत गुरुवर्य महंत श्री भास्करगिरीजी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या शिस्तबद्ध नियोजनात गोवत्स श्री राधाकृष्ण महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून सुरू असलेल्या श्रीमद भागवत कथा सोहळयामध्ये रविवारी चौथ्या दिवशी पुष्पवृष्टी करून भगवान श्रीकृष्ण परमात्म्याचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. जन्मोत्सव प्रसंगी "किती सांगू मी सांगू कुणाला", आज आनंदी आनंद झाला"च्या गीतावर बालवारकऱ्यांसह भाविकांनी ठेका



देवगड येथे अत्यंत उत्साहात आणि सात्विक वातावरणात श्रीमद भागवत कथा व किर्तन महोत्सव सुरू आहे. या सोहळ्याच्या अंतर्गत रविवारी 'श्रीकृष्ण जन्मोत्सव' हजारो भाविकांच्या उपस्थितीत फुलांची उधळण करत आणि माता-भगिनींच्या लक्षणीय उपस्थितीत मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी झालेल्या जन्मोत्सव सोहळयाच्या प्रसंगी भगवान श्रीकृष्ण परमात्म्याच्या मूर्तीचे पूजन व श्री राधाकृष्णजी महाराजांचे संतपूजन गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. श्रीकृष्ण जन्मोत्सवाच्या सोहळयाच्या प्रसंगी "किती सांगू मी सांगू"कुणाला,..आज आनंदी आनंद झाला"", "हाथी घोडा पालखी,जय हो कन्हैय्या लाल की" असा जयघोष करण्यात आला.या नामघोष प्रसंगी भाविकांनी नृत्याद्वारे ठेका धरला होता तर श्री राधाकृष्णजी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांनी फुगडी खेळत जन्म सोहळयाच्या प्रसंगी आनंद लुटला. उपस्थित बालवारकऱ्यांनी ही नृत्य करत जन्मोत्सव सोहळयाचा आनंद घेतला. झालेल्या श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळ्याला महंत अवधूत महाराज,महंत आनंद चैतन्य महाराज,बाळकृष्ण महाराज दिघे,दादा महाराज वायसळ,सिताराम महाराज मगर, मारुती महाराज जाधव, दिनेश महाराज नेकनूर (बंकट स्वामी आश्रम), रणमले महाराज,गणेशानंद महाराज, अशोक महाराज रासकर, राम महाराज खरवंडीकर, कृष्णा महाराज हारदे, योगेश महाराज होन, अशोक महाराज कचरे,रमेश महाराज मोरे, कृष्णा महाराज रासने आदी उपस्थित होते.

या संपूर्ण सोहळयात रोज होणाऱ्या कथेच्या प्रारंभी व समारोपप्रसंगी होणारे अभ्यासपूर्ण सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध निवेदक बजरंग विधाते हे आपल्या अमोघ वाणीने,सुश्राव्य आवाजात आणि अत्यंत कौशल्याने करत आहेत. विलोभनीय सजावट आणि भक्तीचा मळवट देवगड संस्थानचा स्वच्छ-सुंदर परिसर, विलोभनीय श्री सजावट, आकर्षक रंगसंगती आणि नयनरम्य प्रकाश योजना यामुळे संपूर्ण कथा मंडप अधिकच खुलून दिसत आहे. सध्या कडक ऊन असले तरी सभागृहात कुलर आणि पंख्यांची उत्तम व्यवस्था केल्यामुळे भक्तांना उन्हाचा कोणताही प्रादुर्भाव जाणवत नाही. विष्णू याग आणि भागवत कथेच्या या धार्मिक सोहळ्यामध्ये विष्णू यागाचे मुख्य पौरोहित्य भेंडे येथील वेदशास्त्रसंपन्न आचार्य गणेशगुरु कुलकर्णी हे करत असून भागवत कथेचे रसाळ निरूपण जोधपूर येथील विख्यात संत गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज करत आहे.कथेच्या सोबतच पहाटे काकडा आरती,श्रीमदभगवत गीता पाठ, दुपारी हरी किर्तन,सायंकाळी हरिपाठ व भजनाचे भरगच्च कार्यक्रम हजारो भाविकांच्या उपस्थितीत साजरे होत आहे

अन्नपूर्णा प्रसादालयात महाप्रसादासाठी आलेल्या हजारो भाविकांसाठी'अन्नपूर्णा प्रसादालयामध्ये सकाळ संध्याकाळ महाप्रसादाचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले आहे. आलेल्या प्रत्येक भक्ताला सुलभतेने व शिस्तीत प्रसाद मिळावा याची विशेष काळजी येथे घेतली जात आहे. सेवाधारी मंडळाचे चोख व्यवस्थापन या सोहळयात होत आहे.गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराजांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनाखाली अन्नपूर्णा समिती, स्टेज व्यवस्थापन, रंगमंच देखभाल, सभागृह व्यवस्थापन आणि वाहनतळ व्यवस्थापन अशा विविध समित्या अहोरात्र काम करत आहे.

# जामखेडमध्ये अवैध दारू विक्रीवर मोठी कारवाई

**जामखेड : (स. गांवकरी)**

- पाच ठिकाणी छापे, पाच गुन्हे दाखल
- खर्डा पोलीस पथकाची धडक मोहीम
- ४१ हजार ४७० रुपयांचा देशी-विदेशी दारूचा मुद्देमाल जप्त

अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मा. श्री. मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार जामखेड शहरात सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीविरोधात खर्डा पोलीस ठाण्याच्या पथकाने धडक कारवाई करत पाच ठिकाणी छापे टाकून पाच गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईत ४१ हजार ४७० रुपयांचा देशी व विदेशी दारूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलीस अधीक्षकांना गुप्त बातमीदारामार्फत जामखेड शहरातील विविध ठिकाणी अवैधरित्या दारू विक्री होत असल्याची माहिती प्राप्त झाली होती. त्या माहितीच्या आधारे खर्डा पोलीस ठाण्याचे सपोनि उज्वलसिंह राजपूत यांना विशेष कारवाईचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार सपोनि राजपूत यांनी पथकासह जामखेड शहरात छापेमारी मोहीम राबवत खालील पाच ठिकाणी कारवाई केली : हॉटेल सागर, खर्डा रोड, जामखेड हॉटेल तांबे, खर्डा रोड, जामखेड हॉटेल साई, खर्डा रोड, जामखेड हॉटेल साहेबा, खर्डा रोड, जामखेड हॉटेल पाटीलवाडा, नगर रोड, जामखेड या कारवाईदरम्यान अवैधरित्या साठवून ठेवलेला देशी व विदेशी दारूचा साठा जप्त करण्यात आला असून जामखेड पोलीस ठाण्यात दारूबंदी कायद्यान्वये पाच स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणी सागर पांडुरंग नेटके, ज्ञानेश्वर रंजित तांबे, राजेंद्र रामभाऊ देवकाते, सचिन विक्रम तनपुरे आणि उमेश विनोद मुळे या हॉटेल चालक-मालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कुलबुर्गे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविचंद्र लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# राजेश्वर देशमुख, अमोल डाढाळे झाले स्वीकृत नगरसेवक

## अर्धापूर नगरपंचायतमध्ये पत्रकार राजेश्वर देशमुख अमोल डढाळे याची स्विकृत नगरसेवक पदी निवड

**अर्धापूर : (स. गांवकरी)**

अर्धापूर नगरपंचायतीच्या दोन स्वीकृत नगरसेवकांची निवड प्रक्रिया शुक्रवारी दि २२ मे रोजी पार पाडली आहे आहे. शहर विकास आघाडीचे राजेश्वर देशमुख, अमोल डाढाळे यांची बिनविरोध निवड झाली आहे. ही निवड जाहीर होताच शहर विकास आघाडीच्या कार्यकत्यांनी फटाके वाजवून व गुलाल उधळून जल्लोष साजरा केला.





नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक सहा महिन्यांवर आली असतांना विधानपरिषद स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत दोन हाक्काचे मतं वाढविण्यासाठी शहर विकास आघाडीच्या नेत्यांनी स्वीकृत नगरसेवक निवड करण्यात आली आहे. नगरपंचायतीच्या सभागृहात उपविभागीय अधिकारी डॉ सचिन खल्लाळ यांच्या अध्यक्षतेखाली निवड प्रक्रिया पार पडली. त्यांना सहकार्य मुख्याधिकारी जगदीश दळवी यांनी केले. या विशेष सभेला शहर विकास आघाडीच्या नगराध्यक्षा सौ वैशाली देशमुख, उपनगराध्यक्ष मुक्तेदार खान पठाण, गटनेत्या शालीनी शेटे, नगरसेवक बाबुराव लंगडे, डॉ पल्लवी लंगडे, कान्होपात्रा माटे, छत्रपती कानोडे, सोनाजी सरोदे, मिनाक्षी राऊत, यासमीन सुलताना, नामदेव सरोदे, सलीम कुरेशी, सुमेरा बेगम हे नगरसेवक उपस्थित होते. शहर विकास आघाडीचे संख्याबळ तेरा असल्याने या आघाडीला दोन नगरसेवकांचा कोटा देण्यात आला. त्यामुळे शहर विकास आघाडीच्या गटनेत्यांनी नामनिर्देशीत वार्ड क्रमांक आठ मधील अमोल साहेबराव डढाळे नगरसेवक निवड करण्यात आली अर्धापुर शहर विकास आघाडीचे दोन स्वीकृत नगरसेवक निवडून येणार हे निश्चित होते. या दोन नगरसेवकांच्या निवडीचे सर्व अधिकार माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांना देण्यात आले होते. या स्वीकृत नगरसेवकपदासाठी इच्छीकांची संख्या खूप मोठी होती. माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांनी सर्वांना धक्कादेत स्वातंत्र्यसैनिक कुटुंबातील राजेश्वर देशमुख व कोणत्याही प्रकारची राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या एक सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील आमोल डढाळे यांना संधी दिली.


व वार्ड क्रमांक नऊ मधील राजेश्वर लक्ष्मीकांत देशमुख यांची निवड झाल्याची घोषणा करण्यात आली. या निवडणुका प्रक्रियेनंतर नगरपंचायतीच्या सभागृहात नवनिर्वाचित नगरसेवकांचा छोटेखानी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते तसेच भारतीय जनता पक्षाचे सोशल मीडिया तालुका प्रमुखपदी गुरुराज रणखांब निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पक्षाचे तालुका प्रभारी किशोर स्वामी तालुकाध्यक्ष बालाजी गव्हाणे, प्रवीण देशमुख, व्यंकटराव साखरे शहराध्यक्ष योगेश हाळदे, राजु शेटे, डॉ विशाल लंगडे, प्रल्हाद माटे प्रमोद मुळे, उमेश सरोदे, व्यंकटी राऊत, गाजी काजी, मुसवीर खतीब, नितीन डढाळे, दिलीप डढाळे, शिवराज डढाळे, प्रशांत खैरनार, शंकर ढगे, राजु पवार, शंकर करंडे, बाबुराव जाधव, मारोती माटे, गंगाधर राऊत, नितीन गोरे, नागोराव साबळे, बाबुराव जाधव.. बाळु माटे, गोपाल पंडित, राजु साबळे, शंकर डोलारकर व नगरपंचायत सर्व स्टॉप आदी उपस्थित होते.

# पडघ्यातील १०० वर्षे जुनी ऐतिहासिक ‘सतीची विहीर’ चोरीला?

## प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे संतापाची लाट : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पाणी सत्याग्रहाशी संबंधित वारसा धोक्यात

**भिवंडी : (स. गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील पडघा गावातील सुमारे १०० वर्षांहून अधिक इतिहास असलेली आणि सामाजिक न्यायाच्या चळवळीची साक्ष मानली जाणारी ‘सतीची विहीर’ रहस्यमयरीत्या बुजवण्यात आल्याचा प्रकार समोर आल्यानंतर परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे या प्रकरणाला तब्बल पाच महिने उलटूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत “ही विहीर अक्षरशः चोरीला गेली आहे” असा गंभीर आरोप केला आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाणी सत्याग्रहाशी संबंधित मानली जाणारी ही ऐतिहासिक विहीर सर्वे नं. ७९/१० मध्ये अस्तित्वात होती. मात्र काही महिन्यांपूर्वी ती अचानक बुजवण्यात आल्याचे उघड झाल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते शरद साने आणि मिलिंद जाधव यांनी विविध शासकीय कार्यालयांकडे सातत्याने पाठपुरावा सुरू केला. त्यांनी पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, ठाणे जिल्हाधिकारी, भिवंडी प्रांताधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी तसेच तलाठी कार्यालयाकडे लेखी निवेदने सादर करून विहीर पुन्हा खुली करण्याची आणि तिचे ऐतिहासिक स्वरूप जतन करण्याची मागणी केली होती. या निवेदनानंतर मंडळ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून अहवाल भिवंडी तहसील कार्यालयाकडे सादर केल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर तहसीलदार कार्यालयाकडून पडघा ग्रामपंचायतीस पत्र देण्यात आले. सदर प्रकरण ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने योग्य ती कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, तहसीलदारांच्या आदेशानंतरही ग्रामपंचायतीने कोणतीही ठोस कारवाई न केल्याचा आरोप करण्यात येत आहे.

सामाजिक कार्यकर्ते मिलिंद जाधव यांनी या प्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करत “इतिहास जपण्याऐवजी प्रशासन त्यावर माती टाकत आहे,” असा आरोप केला. तर सामाजिक कार्यकर्ते शरद साने यांनी “सतीची विहीर शोधून देणाऱ्यास योग्य ते बक्षीस दिले जाईल,” अशी घोषणा केल्याने या प्रकरणाची चर्चा संपूर्ण परिसरात रंगू लागली आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, ही विहीर केवळ पाण्याचा स्रोत नव्हती, तर सामाजिक समतेच्या लढ्याची ऐतिहासिक साक्ष होती. त्यामुळे या वारशाचे संवर्धन करणे ही प्रशासनाची जबाबदारी असताना संबंधित यंत्रणांकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे जनतेत रोष निर्माण झाला आहे. दरम्यान, “विहीर नेमकी कुठे गेली?”, “ती जाणीवपूर्वक बुजवण्यात आली का?”, “जबाबदारांवर कारवाई का होत नाही?” असे प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याची टीकाही होत आहे. पडघ्यातील ‘सतीची विहीर’ पुन्हा प्रकाशात येणार का, की इतिहासाच्या पानांतच कायमची गडप होणार? याकडे आता केवळ पडघाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित,

# आनंदगड शैक्षणिक संकुल

आनंदगड, वीरगाव ता. अकोले, जि. अहिल्यानगर



रौप्यमहोत्सवी वर्ष
वर्ष १९९९-२०२४

पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी आनंदगड शैक्षणिक संकुल येथे स्वप्न प्रत्यक्षात साकारले जातात!

(D.T.E., MSBTE, DBAT University P.C.I. Approved)

DTE Code **5480**

## मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी

| | डी फार्मसी | बी फार्मसी |
|---|---|---|
| पात्रता | १२ वी पास (PCB / PCM) | १२ वी पास (PCB / PCM & CET) |
| कालावधी | २ वर्ष | ४ वर्ष |
| प्र.क्षमता | ६० विद्यार्थी | ६० विद्यार्थी |

विद्यार्थ्यांसाठी बस सुविधा उपलब्ध!

- संपर्क -
7709203202
9421190696 | 9689758321

ग्रामीण महाराष्ट्रातील ISO मानांकित शाळा

## धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मिडिअम स्कुल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज

के जी ते १२ वी विज्ञान शाखा
(इंग्रजी माध्यम)

अत्यल्प फी सर्वोत्कृष्ठ शिक्षण



आपल्या पाल्याच्या शालेय प्रवेशासाठी संस्कारक्षम इंग्रजी माध्यमाची प्रयोगशील शाळा

- संपर्क -
9158077688
7875074070 | 9975276670

## आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज

पत्ता: आनंदगड शैक्षणिक संकुल, आनंदगड, वीरगांव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर
DTE, Govt of Maharashtra M.S.B.T.E., Mumbai AICTE, New Delhi Approved

DTE Code 05662

- सिव्हिल इंजिनिअरिंग 60
- मॅकॅनिकल इंजिनिअरिंग 60
- कॉम्प्युटर इंजिनिअरिंग 60
- इलेक्ट्रिकल अ‍ॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स 60
- आर्टिफिशीअल इंटेलिजीअंस अ‍ॅण्ड मशीन लर्निंग 60

- संपर्क -
9209645837 | 9922545516
9765431168 | 7028724045 | 9922161686



महाराष्ट्र शासन वैद्यकिय शिक्षण व
औषधी द्रव्य विभाग महाराष्ट्र कौन्सिल ऑफ अ‍ॅक्युपंक्चर, मुंबई
- मान्यता प्राप्त वैद्यकीय अभ्यासक्रम -

Anandgad Virgaon

## मातोश्री गंगुबाई शिंदे अ‍ॅक्यूपंक्चर कॉलेज अ‍ॅण्ड हॉस्पिटल

डिप्लोमा इन अ‍ॅक्युपंक्चर थेरपी (DAT)

| | |
|---|---|
| प्रवेश क्षमता | ५० विद्यार्थी |
| डिप्लोमा कालावधी | २ वर्षे |
| शैक्षणिक पात्रता | इ. १२ वी पास |

सुविधा
- सर्व सुविधायुक्त भव्य कॉलेज व हॉस्पिटल इमारत
- तज्ञ व अनुभवी प्राध्यापक व अ‍ॅक्युपंक्चरिस्ट
- अ‍ॅक्युपंक्चर उपचार पद्धती सुविधा
- वसतिगृह सुविधा उपलब्ध

- संपर्क -
9011271729
9834719663 | 7028724045

॥ सुजाता ॥ अकोले 9970095289

## थोडक्यात पण महत्वाचे



### नदीद्वारे व पिंपळगाव जोगे धरणातून कालव्याद्वारे शेतीला पाणी

शिवनेरी (स. गांवकरी) : माणिकडोह ७९. ९९ , चिल्हेवाडी ८२.०७, घोड १९८ . ४४ या धरणांमधून नदीद्वारे द ल घ फु प्रमाणे शेतीला पाणी सोडण्यात आले आहे . चिल्हेवाडी धरणातून शेतीसाठी नदी द्वारे सांडवा १५० क्युसेक्स सोडण्यात आले आहे. पिंपळगाव जोगे २५० डिंभे डावा ६२५ व चिल्हेवाडी ३० क्युसेक्स प्रमाणे कालव्याद्वारे शेतीला पाणी सोडण्यात आले आहे. कुकडी पाटबंधारे विभागातील धरणातील पातळी मीटर / टक्केवारी पुढील प्रमाणे : - येडगाव ६३८ . ६५० / ५४ . १० , माणिकडोह ६८७ . २९० / ५ . ९९ , वडज ७११ . ५८० / ३५ . ४५ , पिंपळगावजोगे ६८२ . ७५० / १४. ४८ , डिंभे ६९३ . ५१० / १४. ६४ , विसापूर ६०२ . ०३० / १२७८ , चिल्हेवाडी ७३० . २०० / ६२.४० व घोड ५४१ . ५२० / ३ . ५७ अशी आहे . कुकडी पाटबंधारे विभागातील आजचा उपयुक्त एकूण साठा ४४७० . ०५ व मागील वर्षाचा साठा २२१२ . २१ तसेच सर्व धरणातील आजची टक्केवारी १५ . ०६ व मागील वर्षाची टक्केवारी ७ . ४५ आहे. जुन्नर तालुक्यात मागील वर्षी उन्हाळा व चालू वर्षाचा उन्हाळा तीव्रता खूप जास्त आहे . यामुळे शेतीला व मुक्या जनावरांना पाणी महत्त्वाचं आहे . आदिवासी भागातील नागरिक व महिलावर्ग पिण्याच्या पाण्यासाठी वन वन हिंडत आहे.



### २० गावातील वाडीवस्तीमध्ये टँकरने पाणीपुरवठा : भीषण पाणीटंचाई

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील आदिवासी दुर्गम भागातील २० गावातील वाडी वस्तीमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरळीत सुरू आहे. तालुक्यात पाऊस वेळेवर सुरू न झाल्यास नागरिकांना भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार आहे असे चित्र सध्या दुर्गम भागामध्ये पहावयास मिळत आहे . तहसील कार्यालय व पंचायत समिती कार्यालय मार्फत तालुक्यातील आदिवासी दुर्गम भागातील गावाची संख्या ८ , ग्रामपंचायत संख्या १७ आहे. गावठाणा मध्ये ३८०५ , वस्ती ९६ तसेच वाड्या मध्ये १८९०५ या सर्व २२ , ८०६ नागरिकांना वेळेवर ४१ टँकरच्या खेपा करून पाणीपुरवठा देण्यात येत आहे . यासाठी तालुक्यातील १५ विहिरी व ३ बोअरवेल अधिग्रहण करण्यात आले आहे . यामुळे टंचाईग्रस्त भागातील नागरिकांना पाणीपुरवठा सुरळीत देण्यात येत आहे. गावांची नावे व लोकसंख्या पुढीलप्रमाणे : - शिंदेवाडी २०३० , आणे ४२९५ , मांडवे १००८ , कोपरे १००३ , सुकाळवेढे ४९६ , हडसर ३५० , निमगिरी १५४० , गोद्रे १०५५ , अंजनावळे १५४३ , नळावणे १३६१ , हडसर ११३८ , गुळुंचवाडी १५०० , सितेवाडी ५९० , देवळे ६०३ , तळेरान २३५६ , खटकाळे - खैरे २५० , सोनावळे , तांबे ८२० व आंबे ६२० या गावातील सर्व नागरिकांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे.

### निरंजन देशमुख यांची सामाजिक बांधिलकी ठरतेय प्रेरणादायी

नारायणगाव (स. गांवकरी) : पत्रकार निरंजन देशमुख यांनी तब्बल २५ वर्षांच्या पत्रकारितेदरम्यान ग्रामीण भागात फिरताना शेतकरी मुलांच्या लग्नाची गंभीर समस्या जवळून अनुभवली. या प्रश्नावर समाजात जनजागृती व्हावी या उद्देशाने त्यांनी चित्रपट माध्यमाचा उपयोग करत “नवरदेव” या सामाजिक चित्रपटाची निर्मिती केली. शेतकऱ्यांच्या जीवनातील वास्तव आणि संघर्ष रुपेरी पडद्यावर प्रभावीपणे मांडत त्यांनी एक सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम उभा केला आहे. २०२२ पासून सुरू झालेल्या या प्रवासात त्यांना अनेक कठीण प्रसंगांचा सामना करावा लागला. आर्थिक अडचणी, संघर्ष आणि विविध संकटांवर मात करत त्यांनी कर्ज काढले, स्वतःची जुनी गाडी विकली तसेच गोठ्यातील गायी, कालवडी आणि कडबा कुट्टी मशीनही विकून चित्रपट पूर्ण केला. त्यांच्या मेहनतीतून, जिद्दीतून आणि समर्पण भावनेतून “नवरदेव” चित्रपट साकार झाला आहे. ग्रामीण भागातील यात्रा, जत्रा, गणेशोत्सव, नवरात्र उत्सव तसेच विविध सामाजिक कार्यक्रमांमधून हा चित्रपट विनामूल्य दाखवला जात असून शेतकरी मुलांच्या लग्नाच्या ज्वलंत प्रश्नावर प्रभावी जनजागृती केली जात आहे. शेतकरी बांधवांसह समाजातील विविध स्तरांतून या कार्याचे कौतुक होत असून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात हा चित्रपट पोहोचवण्याचा संकल्प पत्रकार निरंजन देशमुख यांनी केला आहे.

### शिष्यवृत्ती परीक्षेत कन्या विद्यालय अव्वल



श्रीगोंदा (स. गांवकरी) : नुकत्याच जाहीर झालेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा निकालात श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाने घवघवीत यश संपादन करत आपले अव्वल स्थान कायम राखले आहे. इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल पुढीलप्रमाणे लागला असून एकूण 104 विद्यार्थिनी परीक्षेला प्रविष्ट झाल्या होत्या. त्यापैकी 69 विद्यार्थिनी पात्र ठरल्या असून 35 विद्यार्थिनी अपात्र ठरल्या. गैरहजर विद्यार्थिनींची संख्या शून्य होती. विद्यालयाचा निकाल 66.33 टक्के लागला. इयत्ता पाचवीतील गुणवंत विद्यार्थिनी (195 पेक्षा अधिक गुण) पुढीलप्रमाणे : भूमी दादा साळुंके – 246, सान्वी सुधीर साबळे – 238, सृष्टी काकासाहेब खोसे – 224, श्रावणी उद्धव दिंडे – 222, आरोही शरद तरटे – 220, वैष्णवी रमेश हराळ – 220, अनन्या चंद्रशेखर उदार – 218, वृंदावणी पद्माकर गिरमकर – 210, शुभ्रा हंबीर म्हस्के – 208, प्राची अजित बोरुडे – 206, सलिहा जुबेर पठाण – 206, वेदिका गणेश शेंडगे – 206, अनन्या प्रसाद शिंदे – 204, पायल रावसाहेब दांडेकर – 202, मनस्वी वैभव सोनवणे – 198, राजनंदिनी संदीप राऊत – 198, ईश्वरी ज्ञानदेव पोळ – 196. या विद्यार्थिनींना मराठी विषयासाठी श्रीम. राऊत एस. डी., गणितासाठी श्रीम. वाघचौरे एस. व्ही. (विभागप्रमुख), इंग्रजीसाठी श्रीम. घोडे पी. बी. तसेच बुद्धिमत्ता विषयासाठी श्री. गारुडकर एस. जी. यांनी मार्गदर्शन केले. इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकालही उल्लेखनीय लागला. या परीक्षेसाठी 88 विद्यार्थिनी प्रविष्ट झाल्या होत्या. त्यापैकी 45 विद्यार्थिनी पात्र ठरल्या, 40 अपात्र ठरल्या तर 3 विद्यार्थिनी गैरहजर होत्या. विद्यालयाचा निकाल 52.9 टक्के लागला. इयत्ता आठवीतील गुणवंत विद्यार्थिनी (200 पेक्षा अधिक गुण) पुढीलप्रमाणे : स्वरांजली संदीप भगत – 274, समृद्धी सचिन शेळके – 268, नीता नितीन सप्रे – 264, श्राव्या मच्छिन्द्रनाथ लोखंडे – 262.

# मराठा सोसायटी संस्थेचा वधू-वर परिचय मेळावा उत्साहात संपन्न




पिंपळगाव (ता. आंबेगाव) : (स. गांवकरी)

मराठा सोसायटी संस्था आयोजित मराठा वधू-वर परिचय मेळावा रविवार दि. २४ मे २०२६ रोजी गीतमाला लॉन्स, पिंपळगाव (ता. आंबेगाव, जि. पुणे) येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, माजी गृहमंत्री श्री दिलीपरावजी वळसे पाटील, मराठा सोवरीक संस्थापक व अध्यक्ष श्री अशोक पांडुरंग कुटे, आंबेगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे श्री गणपतशेठ ढेरंगे, महाराष्ट्र राज्य वाहतूक सेनेचे श्री संदीपभाऊ ढेरंगे, श्री राजेंद्र पांडे, पुणे जिल्हा प्राथमिक

**समाज एकोपा आणि प्रगतीचा संदेश!**

शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष श्री दत्तात्रय वाळुंज, श्री शंकरभाई शाह, शिनोलीचे सरपंच श्री संतोष शेठ बोऱ्हाडे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच ग्रामस्थ मंडळींचीही मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. यावेळी बोलताना श्री नानजीभाई ठक्कर म्हणाले की, “मराठा समाजाच्या प्रगतीसाठी वधू-वर परिचय मेळावे ही काळाची गरज आहे. अशा उपक्रमांमुळे युवक-युवती आणि कुटुंबांना योग्य परिचयाचे व्यासपीठ उपलब्ध होते. समाजात एकोपा, विश्वास आणि संस्कार टिकवून ठेवण्यासाठी अशा कार्यक्रमांचे विशेष महत्त्व आहे.” ते पुढे म्हणाले की, आजच्या आधुनिक युगात शिक्षण, संस्कार आणि कुटुंबव्यवस्था यांचा समतोल राखणे आवश्यक असून युवक-युवतींनी उच्च शिक्षण घेऊन समाजाचे नाव उज्वल करावे तसेच सामाजिक बांधिलकीही जपावी. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री अशोक पांडुरंग कुटे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, “मराठा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र येणे ही आजची मोठी गरज आहे. शिक्षण, उद्योग, रोजगार आणि वैवाहिक जुळणी या क्षेत्रात समाजाची प्रगती व्हावी या उद्देशाने हा वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे.” ते पुढे म्हणाले की, आजच्या धावपळीच्या जीवनात योग्य स्थळ शोधणे अनेक कुटुंबांसाठी कठीण झाले असून या मेळाव्याच्या माध्यमातून युवक-युवती आणि पालकांना विश्वासार्ह व्यासपीठ उपलब्ध होत आहे. समाजातील नाती दृढ करण्यासाठी अशा कार्यक्रमांची आवश्यकता असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्ष श्री अशोक पांडुरंग कुटे यांनी श्री नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांचा सन्मान करून त्यांचे विशेष आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजकांनी परिश्रम घेतले. उपस्थित युवक-युवती, पालक आणि ग्रामस्थांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## आरोपींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

NEET-2026 पेपरफुटी प्रकरणातील मुख्य आरोपी शिवराज मोटेगावकर व इतर सर्व आरोपींवर देशद्रोह व सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी डॉ. दिलीप पवार यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, NEET-2026 ही राष्ट्रीय स्तरावरील वैद्यकीय प्रवेश परीक्षा राष्ट्रीय गोपनीयतेच्या कक्षेत येते. मात्र आरोपींनी संगनमत करून प्रश्नपत्रिका चोरून आर्थिक स्वार्थासाठी ती लीक केली. या देशविघातक कृत्यामुळे लाखो प्रामाणिक व होतकरू विद्यार्थ्यांवर अन्याय झाला असून त्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे. अनेक विद्यार्थी व त्यांची कुटुंबे मानसिक व आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त झाली आहेत. परीक्षेतील अपयश व नैराश्यामुळे काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या दुर्दैवी घटना घडल्या आहेत. ज्या पालकांनी बेकायदेशीररित्या पेपर विकत घेतले, त्यांनी देखील या गुन्ह्यास खतपाणी घातले आहे.



त्यांच्यावरही कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. या प्रकारामुळे देशाच्या वैद्यकीय क्षेत्राची विश्वासार्हता धोक्यात आली असून देशहितास थेट बाधा निर्माण झाली आहे. देशहित बाधित करणाऱ्या, तरुण पिढी बरबाद करणाऱ्या व वैद्यकीय क्षेत्राला कलंक लावणाऱ्या आरोपींवर भारतीय दंड संहिता कलम 124A देशद्रोह अंतर्गत तसेच विद्यार्थ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरल्याने कलम 304 सदोष मनुष्यवध अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## चार मुलींनी साजरा केला बारेकर यांचा सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा

अकोले : (स. गांवकरी)

“मुलगाच हवा” अशी मानसिकता अजूनही समाजात पाहायला मिळते. मात्र “माझ्या मुलीच माझा खरा आधार आहेत” असा विचार जपणारे माजी प्राचार्य मुरलीधर उर्फ अण्णा बारेकर यांच्या सहस्त्र चंद्रदर्शन सोहळ्याचा भावनिक आणि प्रेरणादायी कार्यक्रम नुकताच पार पडला. त्यांच्या चारही मुलींनी एकत्र येत हा सोहळा मातोश्री लॉन्स वर मोठ्या उत्साहात साजरा केला.



सत्यनिकेतन संस्थेच्या सर्वोदय विद्या मंदिरचे माजी प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त झालेले मुरलीधर बारेकर यांनी आयुष्याची ८२ वर्षे पूर्ण केली आहेत. नियमित प्राणायाम, व्यायाम, फिरणे आणि संतुलित आहार यामुळे आजही त्यांची प्रकृती उत्तम आहे. त्यांच्या सहचारिणी पुष्पा बारेकर उर्फ नानी यांच्या साथीने अण्णांचे आयुष्य आजही अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. अण्णांना सुनीता गाडेकर, संगीता मांडवेकर, सोनाली भालेकर आणि स्वाती भालेकर या चार पदवीधर मुली आहेत. आपल्या आई-वडिलांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या या चारही मुलींनी आपल्या कुटुंबासह अण्णा-नानींचा सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा साजरा केला. जावई ज्ञानेश्वर, विठ्ठल, विवेक, संजय तसेच नातजावई विभव कशाळकर यांनीही अण्णा-नानींना आई-वडिलांप्रमाणे मान दिला आहे. त्यामुळे मुलगा नसल्याची खंत त्यांना कधीच वाटली नाही. काही वर्षांपूर्वी मोठ्या आजारातून मुरलीधर बारेकर आत्मविश्वासाने बाहेर पडले. त्या कठीण काळात मुलींनी त्यांना मोठा मानसिक आधार देत उपचारासाठी साथ दिली. त्यातून ते पूर्णपणे बरे झाले. त्यानंतर मुलींनी आपल्या अण्णांचा वाढदिवस आणि सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा विशेष पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय घेतला.

यावेळी ८१ दिव्यांनी औक्षण करून मुलींनी आपल्या आई-वडिलांप्रती असलेले प्रेम व्यक्त केले. मुलींनी आपल्या भावना व्यक्त करताच उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

या कार्यक्रमाला माजी प्राचार्य ठकाजी कानवडे, मिलिंद उमराणी, नंदकिशोर बेल्हेकर, भारती महाले, विलास नवले, प्राचार्या मंजुषा काळे, विद्यार्थी, पालक व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रसंगी बोलताना प्राचार्या मंजुषा काळे म्हणाल्या, “आजचा हा क्षण केवळ सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा नसून एका महान व्यक्तिमत्त्वाला दिलेला मानाचा मुजरा आहे. मुरलीधर बारेकर सर हे केवळ शिक्षक नाहीत, तर अनेकांच्या आयुष्याला दिशा देणारे दीपस्तंभ आहेत. त्यांच्या मोकळ्या, प्रेमळ आणि आपुलकीच्या स्वभावामुळे प्रत्येक जण त्यांना आपल्या कुटुंबातील सदस्य मानतो.”

त्या पुढे म्हणाल्या, “आजच्या काळात मुलगा-मुलगी असा भेद अजूनही दिसतो.

मात्र ‘माझ्या चार मुलीच माझ्या मुलाची उणीव भरून काढतील, त्याच माझ्या वंशाचा दिवा आहेत,’ हा सरांचा विचार समाजासाठी आदर्श आहे. सत्यनिकेतन संस्था आणि श्री स्वामी समर्थ संस्थेच्या पायाभरणीत जर कोणाचे निःस्वार्थ योगदान असेल, तर ते पायाचा भक्कम दगड म्हणजे बारेकर सर उर्फ आपले अण्णा होत.”सूत्र संचलन प्राचार्य किरण भागवत तर आभार सोनाली भालेकर हिने मानले.

## नवरदेव चित्रपटाचा ७५वा शो नारायणगाव येथे उत्साहात संपन्न; राजू शेट्टी यांची प्रमुख उपस्थिती!



नारायणगाव : (स. गांवकरी)

पुणे जिल्ह्यातील नारायणगाव येथील लक्ष्मी मल्टिप्लेक्स थिएटरमध्ये शेतकरी मुलांच्या लग्नाच्या ज्वलंत प्रश्नावर सामाजिक जनजागृती करणाऱ्या “नवरदेव” या सामाजिक चित्रपटाचा 75 वा शो उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी खासदार राजू शेट्टी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. चित्रपटाच्या प्रदर्शनावेळी अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, प्रतिकूल परिस्थितीतही शेतकरी बांधवांसह महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवत चित्रपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संगमनेर तालुक्यातील शेतकरी नेते संतोष रोहम यांनीही नारायणगाव येथे उपस्थित राहून हा चित्रपट अनुभवला. कोरोना काळात दोन्ही डोळ्यांची दृष्टी गमावूनही त्यांनी चित्रपटातील संवाद, विषयाची मांडणी आणि आशयपूर्ण गाणी यांचे विशेष कौतुक केले. दृष्टी नसतानाही सामाजिक विषयाची प्रभावी मांडणी त्यांना भावल्याचे त्यांनी सांगितले.

दोन तास पंचवीस मिनिटे प्रेक्षकांना खिळवून ठेवणाऱ्या या चित्रपटाद्वारे शेतकरी मुलांच्या विवाह समस्येवर प्रभावी भाष्य करण्यात आले आहे. हा चित्रपट अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी गावागावातील स्वयंसेवी संस्था आणि शेतकरी बांधवांनी पुढाकार घ्यावा, असे मत माजी खासदार राजू शेट्टी यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी उपस्थित प्रेक्षकांनीही भरभरून प्रतिक्रिया देत चित्रपटाचे कौतुक केले. पत्रकार निरंजन देशमुख यांच्या “नवरदेव” चित्रपटाचे राजू शेट्टी यांनी विशेष कौतुक करत, शेतकरी मुलांच्या लग्नाच्या गंभीर प्रश्नाला रुपेरी पडद्यावर अत्यंत प्रभावी आणि दर्जेदार पद्धतीने मांडल्याचे सांगितले.



## नारायणगावात अतिक्रमण कारवाई करण्यास सुरुवात

नारायणगाव : (स. गांवकरी)

नारायणगाव येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावर तसेच दैनंदिन भाजीबाजारातील अतिक्रमणावर ग्रामपंचायत कडून अपेक्षित कारवाई सुरू झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने मात्र हा विषय गांभीर्याने घेतला नसून काहीसे दुर्लक्ष केल्यासारखे वाटत आहे. काही व्यापाऱ्यांनी स्वतःहून अतिक्रमण काढले असून काही व्यापाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले आहे. दैनंदिन बाजारातील ग्रामदैवत मुक्ताबाई देवीकडे जाणारा रस्ता आता काही प्रमाणात मोकळा होणार असून गाळ्यासमोर तीन ते साडेतीन फूट अंतरावरच भाजीच्या, फळांच्या पाट्या व टोपल्या किंवा क्रेट ठेवण्याची परवानगी असणार आहे.तसेच पाटीनुसार रोजचा कर आकारला जाणार आहे. मार्किंग करून दिलेल्या रेषेच्या बाहेर दुकाने थाटल्यास ग्रामपंचायतच्या वतीने कठोर कारवाई करण्यात येईल अशी माहिती माजी उपसरपंच आरिफ आतार व संतोष पाटे यांनी दिली.

## अण्णा हजारे यांनी मांडली आपली रोखठोक भूमिका




अहिल्यानगर : (स. गांवकरी)

सोशल मीडियासह राजकीय वर्तुळात ‘कॉकरोच जनता पार्टी’ या उपरोधिक डिजिटल संघटनेनं धुमाकूळ घातला असून या संघटनेनं सरकारवर केलेल्या आरोपांची चर्चा होत आहे. या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी सरकारला महत्त्वाचा सल्ला दिला. अण्णा हजारे यांनी म्हटलं आहे की, “नवीन राजकीय पक्षाचं नाव झुरळ असलं तरी या पक्षाच्या मागे तरुण मोठ्या संख्येने उभे राहिले आहेत. या पक्षाचं नाव झुरळ हे ठेवण्याचा उद्देश काय होता, हे समजून घेतलं पाहिजे. झुरळ जरी म्हटलं असेल, ते नाव जरी योग्य वाटत नसेल तरी या पार्टीच्या मागे तरुण उभे राहिले हे महत्त्वाचं आहे. युवाशक्ती ही राष्ट्रशक्ती असं समजून शासनाने त्यांना प्रोत्साहन दिलं पाहिजे,” असं आवाहन हजारे यांनी सरकारला केलं आहे.

## पूररेषा प्रश्नावर ठाकरे शिवसेना आक्रमक होणार

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

- सीना नदी पात्र पाहणी झाली, पण प्रश्न सुटला नाही, आता बाधितांच्या संयमाचा अंत पाहू नका - किरण काळे



सीना नदीच्या पूररेषेमुळे निर्माण झालेल्या समस्यां बाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी बाधित नागरिकांना दिलासा मिळवून देण्यासाठी ठाकरे शिवसेना शासन स्तरावर पाठपुरावा करणार असल्याचे म्हटले आहे. प्रशासन, शासनाच्या गंभीर चुकी मुळे हजारो नगरकर त्रस्त आहेत. सीना नदी पात्राची आजवर अनेक वेळा पाहणी झाली, बैठका झाल्या. पण प्रश्न काही सुटला नाही. आता बाधितांच्या संयमाचा अंत पाहू नका. अन्यथा ठाकरे शिवसेना आक्रमक पवित्रा घेईल, असा इशारा काळे यांनी दिला आहे. काळे म्हणाले की, सीना नदी आणि संबंधित नाल्यांच्या पूरनियंत्रण रेषांमुळे शहरातील हजारो जमीनधारक, प्लॉटधारक आणि नागरिक अडचणीत आले आहेत. चुकीच्या पद्धतीने आखण्यात आलेल्या पूररेषेमुळे अनेक भागातील बांधकामयोग्य क्षेत्र प्रभावित झाले असून नागरिकांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक कुटुंबांनी आयुष्यभराची जमा-पूंजी खर्च करून प्लॉट खरेदी केले, मात्र आता त्या जागेवर बांधकाम करता येत नसल्याने त्यांच्या स्वप्नांवर पाणी फिरण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

किरण काळे म्हणाले, या प्रश्नामुळे शहराच्या विकासालाही मोठा फटका बसत आहे. हजारो प्लॉटधारक आणि व्यावसायिकांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले असून या विषयाचा सर्वंकष अभ्यास करून पूररेषेचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे. यापूर्वी लोकप्रतिनिधींच्या पुढाकारातून काही बैठका पार पडल्या होत्या. खात्याचे मंत्री, अधिकाऱ्यां समक्ष प्रत्यक्ष नदीपात्राची पाहणी करत नुसते फोटोसेशन करण्यात आले. मात्र प्रत्यक्षात प्रश्न सुटला नाही. आता बाधितांचा अंत पाहू नये. वेळ प्रसंगी ठाकरे शिवसेना आक्रमक भूमिका घेईल, असा इशारा काळे यांनी दिला आहे. बाधित नागरिकांना आवाहन करताना काळे यांनी सांगितले की, या परिस्थितीत कोणत्याही नागरिकाने निराश होऊ नये. प्रभावित नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी ठाकरे शिवसेना तुमच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. हा केवळ काही व्यक्तींचा प्रश्न नसून हजारो कुटुंबांच्या भविष्याशी संबंधित विषय आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## क्रिएटिव्ह इंजिन एक्स्पो २०२६मधून उलगडणार ऑरेंज इकॉनॉमीचे भवितव्य

पुणे (स. गांवकरी) : बदलत्या जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये आता पारंपरिक उद्योगांच्या जोडीला सर्जनशीलता, कल्पनाशक्ती आणि डिजिटल कौशल्य यांना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. मानवी मेंदूतील कल्पनाशक्तीवर आधारित 'ऑरेंज इकॉनॉमी' अथवा 'क्रिएटिव्ह इकॉनॉमी' ही भारताच्या आर्थिक प्रगतीची नवी दिशा ठरत असून त्याच संकल्पनेवर आधारित 'क्रिएटिव्ह इंजिन एक्स्पो २०२६'चे आयोजन येत्या ३० आणि ३१ मे रोजी गणेश कला क्रीडा मंच,पुणे येथे करण्यात आले आहे. अशी माहिती मुख्य आयोजक सृजन कॉलेज ऑफ डिझाईन चे संस्थापक संतोष रासकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुणे श्रमिक पत्रकार भवन येथे झालेल्या परिषदेला आयआयसीटीचे संचालक आशिष कुलकर्णी, प्रशांत महाडीक - डायरेक्टर, शारदा बिज़नेस सोल्यूशन प्रा लि., निखिल हळ्ळी डायरेक्टर अरेना, विनीता बच्छानी - डायरेक्टर मोशन पिक्चर्स स्कूल आदी मान्यवर उपस्थित होते. एक्स्पो विषयी अधिक माहिती देताना संतोष रासकर म्हणाले, हा एक्स्पो केवळ कला, ॲनिमेशन किंवा तंत्रज्ञानाचा मेळावा नसून भारतातील भविष्यातील अब्जावधी रुपयांच्या क्रिएटिव्ह अर्थकारणाची झलक ठरणार आहे. असल्याचे आयोजकांनी सांगितले . जगभरात वेगाने वाढणाऱ्या डिजिटल आणि क्रिएटिव्ह क्षेत्रामुळे रोजगार, गुंतवणूक आणि आर्थिक विकासासाठी नवे मार्ग खुले होत आहेत. यामुळे भारतासारख्या विकसनशील देशाला जागतिक स्तरावर मोठी संधी निर्माण झाली आहे.



## अळकुटीत ६६ वर्षीय वृद्ध महिलेच्या घरावर दगडफेक

पारनेर (स. गांवकरी) : अळकुटी येथे पाच पिढ्यांपासून राहणाऱ्या ६६ वर्षीय वृद्ध महिला इंदुबाई सुदाम शिंदे , व अर्धांगवायूने ग्रस्त असलेले त्यांचे पती सुदाम शिंदे यांच्यावर त्यांचे शेजारी बबन पांडुरंग शिरोळे यांनी मध्यरात्री दगडफेक करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याबाबत इंदुबाई यांनी पारनेर पोलिस स्टेशनला दिलेल्या तक्रारीत गंभीर आरोप करण्यात आले आहेत. इंदुबाई यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, बबन शिरोळे यांनी त्यांना व त्यांच्या पतीला सतत घर खाली करण्याची धमकी देत असतात. "घर खाली केले नाही तर जीवे मारू," अशा धमक्या देत जातीय शिवीगाळ करणे हे त्यांचे नियमित वर्तन झाले आहे. रविवार दि. १७ मे २०२६ रोजी मध्यरात्री बबन शिरोळे यांनी त्यांच्या घरावर दगडफेक केली. बाहेर आलेल्या इंदुबाई यांच्यावरही दगडफेक करून शिवीगाळ केल्याचे सांगण्यात आले. इंदुबाई यांनी यापूर्वीही पारनेर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिली होती. मात्र पोलिसांनी योग्य दखल घेतली नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. घटनेचा पंचनामा घटना घडल्यानंतर तब्बल चार दिवसांनी करण्यात आला. उलट पोलिसांनी तक्रारदार इंदुबाई यांनाच धमकावल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. सध्या त्या गावगुंड आणि पोलिसांच्या भीतीने त्रस्त असल्याचे सांगतात. "मी वृद्ध महिला आहे व माझे पती अर्धांगवायूने पीडित आहे. पाच पिढ्यांपासूनचे घर सोडायला आम्ही तयार नाही. तरीही आम्हाला सतत त्रास दिला जात आहे," अशी भावना इंदुबाई यांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणी स्थानिक पोलिसांकडून अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. संबंधितांवर तातडीने कारवाई करून वृद्ध दांपत्याला न्याय मिळावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## रस्त्यावर उभारलेल्या प्रवेशद्वाराचे महंत श्री उद्धवजी महाराजांच्या हस्ते उद्घाटन

नेवासा (स. गांवकरी) : नेवासा बुद्रुक शिवारात एस कॉर्नरजवळ असलेल्या जोगेश्वरी माता मंदिर रस्त्यावर जायगुडे परीवारातील सदस्यांनी आपल्या मातापित्यांच्या स्मृती प्रित्यर्थ सुमारे दोन लाख रुपये खर्चाचे प्रवेशद्वार उभारले. आले.या प्रवेशद्वाराचे उदघाटन सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत समन्वयाचार्य श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या हस्ते करण्यात येऊन ते भाविकांच्या सेवेसाठी लोकार्पण करण्यात आले. नेवासा बुद्रुक ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच बाळकृष्ण जायगुडे,गोकुळनाना जायगुडे, जायगुडे,रामचंद्र जायगुडे यांनी आपल्या मातोश्री कै.रंगूबाई माधवराव जायगुडे व पिताश्री माधवराव सखाराम जायगुडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ जोगेश्वरी माता देवस्थानकडे जाणाऱ्या रस्त्यावर सुमारे दोन लाख रुपये खर्च करून हे प्रवेशद्वार उभारले आहे.सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या हस्ते या प्रवेशद्वाराचे पूजन करून उदघाटन करण्यात आले. उभारण्यात आलेल्या प्रवेशद्वारामुळे जोगेश्वरी माता मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे वैभव वाढले असून जागृत असलेल्या जोगेश्वरी माता देवस्थानच्या विकासाला देखील एक निश्चित दिशा मिळणार आहे,आईवडीलांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रवेशद्वार उभारून जायगुडे परिवारातील बाळकृष्ण जायगुडे,गोकुळनाना जायगुडे,रांमचंद्र जायगुडे यांनी समाजाला आदर्शवत ठरेल असे काम केले असल्याचे गौरवोदगार काढले.प्रत्येक मुलांनी देखील आपल्याला जग दाखविणाऱ्या आईवडीलांची सेवा शेवटच्या श्वासापर्यंत करावी असे आवाहन लोकार्पण कार्यक्रम प्रसंगी बोलतांना केले झालेल्या प्रवेशद्वार उदघाटन कार्यक्रम प्रसंगी हभप विजय महाराज पवार,ज्ञानेश्वर महाराज पेचे,मुळा एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष उदयनदादा गडाख, माजी सरपंच प्रकाश सोनटक्के,अण्णाभाऊ पेचे,भानुदास रेडे,गोकुळ गावडे,संजय जायगुडे,विजय जायगुडे, राधाकृष्ण जायगुडे,नानाभाऊ डिके,दिलीप जपे,दादा गावडे, बाबासाहेब डौले,जोगेश्वरी माता जीर्णोद्धार कमिटीचे पदाधिकारी सदस्य,जोगेश्वरी तरुण मंडळाचे पदाधिकारी युवक कार्यकर्ते,नेवासा बुद्रुक पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वनहक्क धारकांसाठी आनंदाची बातमी लाभार्थ्याला मिळणार स्वतंत्र 'शेतकरी

कनाशी (स. गांवकरी) : कळवण सुरगाणा वनहक्क कायद्यांतर्गत पट्टे मंजूर झालेल्या आदिवासी व इतर पारंपरिक वननिवासी शेतकऱ्यांसाठी शासनाने आनंदाची बातमी दिली आहे. आता प्रत्येक वनहक्क धारकाला स्वतंत्र शेतकरी आयडी' (Farmer ID) दिला जाणार आहे. मात्र त्यासाठी (E-KYC )करणे बंधनकारक असल्याचे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, कळवण यांनी स्पष्ट केले आहे. "वनहक्क धारक शेतकऱ्यांना ॲग्रिस्टॅक अंतर्गत शेतकरी आयडी मिळाल्यास पी.एम. किसान, नमो शेतकरी महासन्मान निधी, पिक विमा, खावटी अनुदान यांसारख्या सर्व योजनांचा लाभ थेट व वेळेत मिळेल.

# निकृष्ट जलजीवन योजनेच्या कामाबाबत आमरण उपोषण

इगतपुरी : (स. गांवकरी)

इगतपुरी तालुक्यातील धामणगाव येथील 'जल जीवन मिशन' अंतर्गत १ कोटी ६९ लाख रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेतील भ्रष्टाचाराची चौकशी न झाल्याबाबत येथील सामाजिक कार्यकर्ते मंगेश गाढवे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी आमरण उपोषणाला सोमवारपासून सुरुवात आहे. धामणगाव गावात १ कोटी ६९ लाख रुपयांच्या जल जीवन मिशन पाणीपुरवठा योजनेमध्ये झालेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत आणि भ्रष्टाचाराबाबत काही दिवसांपूर्वी तक्रार केली होती. त्यावर प्रशासनाने १५ दिवसांत विशेष पथकामार्फत




चौकशी करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र अद्याप चौकशी झाली नाही. न्याय न मिळाल्यास आमरण उपोषण सुरूच राहीन असे उपोषण कर्त्यांनी सांगितले. आश्वासनानुसार काही दिवसांपूर्वी संबंधित खात्याचे अधिकारी गावात पाहणीसाठी आले होते. परतु अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे एवढ्या मोठ्या १ कोटी ६९ लाख रुपयाच्या योजनेची चौकशी करण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांकडे कामाचे कुठलेही अधिकृत कागदपत्रे ब्लू-प्रिंट किंवा अंदाजपत्रक उपलब्ध नव्हते. आम्ही याविषयी जाब विचारला असता, संबंधित अधिकाऱ्यांनी अत्यंत बेजबाबदारपणे सांगितले की, "आम्ही संबंधित खात्याला डॉक्युमेंट्स मागितले आहेत, पण ते अजून आलेले नाहीत.

त्यामुळे कागदपत्रे नसल्यामुळे आम्ही हे काम आणि ऑडिट पूर्ण करू शकत नाही. ज्या दिवशी आमच्याकडे डॉक्युमेंट्स येतील, त्याच दिवशी आम्ही चौकशी करू असे सांगितले. या उपोषणाला सागर गाढवे, विजय गाढवे, महेश गाढवे, विलास वाकचौरे, कमलेश गाढवे, समाधान लगड, हर्षद गाढवे, राजू रंगनाथ गाढवे, संपत वाकचौरे, योगेश देशमुख, विक्रम घुमरे, जनार्धन गाढवे, अशोक गाढवे, पुंजाराम गाढवे, माजी सरपंच निवृत्ती जाधव यांनी उपोषण कर्त्यांना जाहीर पाठींबा दिला.

> आधी चौकशीचे आश्वासन देऊन आंदोलन स्थगित करायला लावणे आणि महिनाभरानंतर जेव्हा अधिकारी येतात, तेव्हा कोणतीही कागदपत्रे न आणता 'कागदपत्रे आल्यावर चौकशी करू' अशी उडवाउडवीची उत्तरे देणे, यावरून हे स्पष्ट होते की प्रशासन आणि संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक या योजनेतील भ्रष्टाचाराला पाठबळ देण्याचा व दोषींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करत आहेत. जोपर्यंत या १ कोटी ६९ लाख रुपयांच्या कामाची सर्व अधिकृत कागदपत्रे समोर ठेवून वरिष्ठ पातळीवरून तांत्रिक पाहणी केली जात नाही आणि सविस्तर अहवाल Quality कंट्रोल Repot ग्रामस्थांसमोर जाहीर केला जात नाही, तोपर्यंत आमचा हा लढा थांबणार नाही.
>
> **- मंगेश गाढवे, सामाजिक कार्यकर्ते**

## रावेरचे केळी बियाण्याचे आरूची गुजरातमध्ये मागणी



रावेर : (स. गांवकरी)

रावेर , मुक्ताई नगर , यावल , तसेच संपुर्ण जळगाव जिल्हा भरातुन गुजरात राज्यात केळी बियाण्यांचे आरूची मागणी वाढली असुन , व्यापाऱ्यांची वर्दळ वाढली आहे. मागिल १५ ते २० वर्षा पासून संपूर्ण जिल्हा भरातुन गुजरात राज्यात सर्वत्र अरु पाठवले जात असल्याची माहिती एका व्यापाऱ्याने गांवकरीशी बोलतांना सांगितले. सदरील आरुंना त्याभागातील वातावरण मानवत असल्याने व उत्पादन भरघोस मिळाल्यानंतर या आरुंची तेजी वाढलेली आहे. या आरूंची विक्री या तालुक्यांमध्ये २ रुपये प्रति कंद विक्री केली जाते. कोणत्याच शेतकऱ्याला याचा मोबदला दिला जात नाही. विदर्भात या आरूंना बेणे, म्हणुनही लागवडीसाठी वापर केला जातो. सदर आरुंचा ट्रासफोर्स खर्च त्याच बरोबर त्याला लागणारे बारदान , व पॉकिंग खर्च असे मिळून त्या भागातील शेतकऱ्यांना ४ रुपये ते४५० रुपया पर्यंत विकली जाते. गुजरात राज्यात या आरुंना गाठ म्हणून संबोधिले जाते. काही शेतकरी त्याची सरळ शेतीत लागवड करतात. तर काही आरूची रोपे तयार करून लागवड करतात. साधारण १ मे पासून ते ३० आगष्ट पर्यंत याची लागवड करून , भरघोस उत्पादन घेतात.सदरच्या आरू बियाण्यामुळे, लाखो रुपयांची उलाढाल होत असून, कित्येक हातांना रोजगार उपलब्ध होऊन काम मिळत आहे.

## कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या लढ्याला नवी ताकद

### विलास रौंदळ यांची नाशिक जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती

कळवण, नाशिक : (स. गांवकरी)

नाशिक जिल्ह्यासह राज्यभरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना या संघटनेच्या विस्तार अभियानाला मोठा वेग मिळत असून, संघटनेच्या नाशिक जिल्हा उपाध्यक्षपदी कळवण तालुक्यातील भेंडी येथील युवा व अभ्यासू शेतकरी नेते विलास त्र्यंबक रौंदळ यांची अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे कळवण तालुक्यासह नाशिक जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. भारत दिघोळे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर संघटना विस्ताराचे अभियान सुरू असून, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी अधिक प्रभावी संघटन उभारण्यावर भर दिला जात आहे. याच पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या समस्या, कांद्याचे पडलेले दर, उत्पादन खर्चातील वाढ, बाजारपेठेतील अस्थिरता आणि व्यापाऱ्यांकडून होणारे आर्थिक शोषण याविरोधात संघटनेला अधिक मजबूत करण्यासाठी विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात येत आहेत. कळवण तालुक्यातील भेंडी गावचे रहिवासी असलेले विलास रौंदळ हे शेतकरी प्रश्नांबाबत सातत्याने आवाज उठवणारे, सामाजिक बांधिलकी जपणारे आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांशी जवळीक ठेवणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नियुक्तीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न जिल्हास्तरावर अधिक प्रभावीपणे मांडले जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटातून जात असून, कांद्याला उत्पादन खर्चही निघत नसल्याने अनेक शेतकरी हवालदिल झाले आहेत. काही ठिकाणी संतप्त शेतकऱ्यांनी रस्त्यावर कांदा फेकून आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. अशा गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांना संघटित करून त्यांच्या हक्कासाठी शासन दरबारी भक्कम आवाज उभारण्याची गरज अधिक तीव्र झाली आहे. विलास रौंदळ यांची नियुक्ती ही केवळ पदाची जबाबदारी नसून, शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेऊन त्यांच्या न्याय्य हक्कासाठी संघर्ष करण्याची मोठी जबाबदारी असल्याची भावना व्यक्त होत आहे.

या नियुक्तीबद्दल विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, "गाव ते राज्य... शेतकरी एकजूट!" हा संदेश अधिक बळकट करण्यासाठी ते कार्य करतील, असा विश्वास संघटनेचे जिल्हाध्यक्ष मा. जयदीप भदाणे यांनी व्यक्त केला आहे."

## मीना नदीला पाणी सोडण्यात यावे : प्रमोद खांडगे

खोडद : (स. गांवकरी)

वडज धरणामधून मीना नदीला जनावरांना पिण्यासाठी व शेती पिकांसाठी पाणी सोडण्यात यावे अशी मागणी श्री.गणपतराव नॅनोर कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग नारायणगाव यांच्याकडे गेली. त्यावेळी श्री.सचिन शिंदे डेपोटी इंजिनिअर वडज विभाग. मीना नदीला पाणी सोडण्याची मागणी निमदरी, धोंडकरवाडी, सावरगाव, वडगाव सहानी, पिंपळगाव तर्फे नारायणगाव, गुंजाळवाडी,आर्वी, वारूळवाडी या गावातील शेतकरी बांधवांनी केली आहे.



फळबागा भाजीपाला पिकांसाठी व जनावरांना पिण्यासाठी वारूळवाडी, गुंजाळवाडी पेशवेकालीन बंधाऱ्यापर्यंत केटी बंधारे भरण्यात यावे. मागणीचा गांभीर्यपूर्वक विचार करावा. तसेच पिंपळगाव तर्फे नारायणगाव वडगाव साहणी येथील जुना केटी बंधारा मोठ्या प्रमाणात लिकेज झाला असून प्रचंड पाणी गळती होत असल्यामुळे बंदरा भरल्यानंतर आठ ते दहा दिवसांत बंधाऱ्यातील पाणी संपले जाते. बंधाऱ्याचे मोठ्या प्रमाणात डापे वाकलेले असून वाकलेल्या डाफ्यांमधून मोठ्या प्रमाणात पाणी गळती होत आहे. तात्काळ ह्या केटी बंधाऱ्याची दुरुस्ती व ढापे उपलब्ध करून देण्यात यावे. पिंपळगाव येथील सत्यकोण केटी बंधाऱ्याचे देखील खालील गॉर्ज चे काम करणे आवश्यक आहे त्या ठिकाणी देखील दुरुस्ती करण्यात यावी. या दोन केटी बंधाऱ्यांचे सर्वे करून तात्काळ शासनाकडून निधी उपलब्ध करून काम करण्यात यावे.

त्याचप्रमाणे कार्यकारी अभियंता श्री.नॅनोर यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकारी व शेतकरी बांधवांनी चर्चा करत असताना सांगितले की, मीना नदीला कॅनॉल मधून पाणी सोडावी लागते त्यावेळी वाळूच्या गोण्या भरून त्या ठिकाणी बंधारा तयार करावा लागतो त्यानंतरच पाणी मीना नदीत येते आणि प्रत्येक वेळेला शेतकऱ्यांकडून वर्गणी रुपात निधी उपलब्ध केला जातो.अनेक वेळेला शेतकऱ्यांची पिळवणूक या निमित्ताने होत असते त्यामुळे या ठिकाणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून मागील वर्षापासून या ठिकाणी गेट (SKF) टाकण्यात यावी अशी मागणी आहे. ती मागणी तात्काळ मंजुरीस दिलेली आहे व काही महिन्यातच कॅनॉलला गेट बसवण्यात येईल असे देखील यावेळी न्यानोर यांनी सांगितले आहे.

निवेदन देतेवेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष श्री. प्रमोद खांडगे पाटील व शेतकरी विकास खांडगे, श्री.महेंद्र खांडगे, श्री.बाळासाहेब बा.वाणी, श्री. सचिन खांडगे, श्री. गौरव वाणी, श्री.ओमकार बोऱ्हाडे, श्री.शांताराम गाढवे उपस्थित होते .

या मागणीचा तात्काळ विचार केला नाही तर,स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र स्वरूपाची आंदोलन पाटबंधारे विभागाच्या कार्यालयासमोर करण्यात येईल असा इशारा देण्यात आला.

## अहिल्यानगर पोलीस मुख्यालयात प्रशिक्षणादरम्यान स्फोट


अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या प्रशिक्षणादरम्यान अत्यंत धक्कादायक दुर्घटना घडली आहे. मॉक ड्रिल दरम्यान हाताळणीचे प्रशिक्षण दिले जात असताना एका हँडग्रेनेडचा हातातच भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत चार प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले आहेत. दि.२३ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास ही घटना घडली. यामुळे पोलीस दलात प्रचंड खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस कर्मचाऱ्यांना हँडग्रेनेड कसा हाताळावा याबाबत प्रात्यक्षिकासह माहिती दिली जात होती. त्याचवेळी अचानक हँडग्रेनेडचा हातातच स्फोट झाला. या दुर्दैवी घटनेत शिवराज पवार, शुभम कावरे, गणेश मढे आणि योगेश सोळुंके हे चार प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. यापैकी दोघांच्या हाताच्या बोटांच्या चिंधड्या उडाल्या आहेत. तर इतर दोन कर्मचारी किरकोळ जखमी झाले आहेत. घटनेनंतर संपूर्ण पोलीस मुख्यालयात एकच पळापळ आणि गोंधळ उडाला. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सर्व जखमी कर्मचाऱ्यांना तातडीने जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी यांनी सांगितले की, हा स्फोट स्मोक हँडग्रेनेड फुटल्यामुळे झाला आहे. जमाव पांगवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या या ग्रेनेडची पिन काढल्यानंतर संबंधित जवानांकडून लिव्हर सुटल्याने हा अपघाती स्फोट झाला. या घटनेमुळे पोलीस वर्तुळातून मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

## श्री बालाजी देवस्थानात विष्णू पंचायतन याग उत्साहात संपन्न

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शहरातील खिस्त गल्ली परिसरातील श्री बालाजी देवस्थान येथे दि. २३ व २४ मे २०२६ रोजी दोन दिवसीय विष्णू पंचायतन यागाचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक सोहळ्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन, धार्मिक विधी आणि महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाची सुरुवात दि. २३ मे रोजी सकाळी ५.०० ते ७.०० या वेळेत महाअभिषेक, तुलसी अर्चन व पुष्प सहस्रअर्चनाने झाली. भक्तांच्या मंत्रोच्चारांनी व वेदघोषांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. दि. २४ मे रोजी सकाळी ९.०० ते दुपारी १.०० या वेळेत विधिवत विष्णू पंचायतन याग पार पडला. त्यानंतर दुपारी १.०० ते ३.०० या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने धार्मिक विधींमध्ये सहभाग घेतला. या धार्मिक कार्यक्रमासाठी उमेश श्रीकांत खांडकेकर, संजय सप्तर्षी,



श्रीकृष्ण बिवलकर, राजेश भिडे आणि सागर देशपांडे यांनी यजमान म्हणून जबाबदारी पार पाडली. तसेच उमेश खांडकेकर, श्रीराम पोळ गुरुजी, प्रसाद देव, औ इत्वधने, समर्थ सप्तर्षी आणि वेदांत कुलकर्णी यांनी गुरुजी म्हणून विविध धार्मिक विधी संपन्न केले. श्री बालाजी देवस्थानतर्फे आयोजित या सोहळ्यामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला.

## स्वरमयी 'संगीत गुरूचरित्र' ने भक्तिभाव जागवला

### सनातन धर्म सभेत कुलकर्णी दाम्पत्याचे सादरीकरण; दत्तभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

सनातन धर्म सभा येथे आयोजित 'श्री. संगीत गुरूचरित्र पारायण' कार्यक्रमात भक्तिरसाचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. श्री सतिश मधुकर कुलकर्णी आणि सौ. हेमा सतिश कुलकर्णी यांनी पद्यरूपी गुरूचरित्राचे सुमधुर गायन सादर करत उपस्थित दत्तभक्तांना मंत्रमुग्ध केले. या पद्यरूपी गुरूचरित्राचे रचनाकार श्री शिवरूपी महाराज हे उत्तर हिंदुस्थानातील रहिवासी होते. शिवस्वरूप विनरावजी हे त्यांचे मूळ नाव असून हिंदी ही त्यांची मातृभाषा होती. उर्दू, पारसी, संस्कृत व मराठी भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. इंग्रजांच्या काळात अधिकारी पदावर कार्यरत असताना त्यांनी ईश्वरभक्तीच्या प्रेरणेने पदाचा राजीनामा देत श्री घृष्णेश्वर मंदिर येथे सेवा सुरू केली.

गुरूचरित्राच्या अनुष्ठानादरम्यान त्यांची भेट गुरु श्री ब्रह्मानंद स्वामी यांच्याशी झाली. त्यांच्या आज्ञेनुसार सात भाग आणि सुमारे १०८ पदांनी




समृद्ध असे हे 'संगीत गुरूचरित्र' तयार झाले. उत्कृष्ट काव्य असूनही छपाईअभावी हा वारसा मर्यादित स्वरूपातच जतन झाला आहे.

कार्यक्रमात संवादिनीवर श्रीमती स्वाती आंबेकर तर तबल्यावर श्री अच्युत घबाडे यांनी सुरेल साथसंगत केली. सतिश मधुकर कुलकर्णी आणि सौ. हेमा सतिश कुलकर्णी यांचा सत्कार पसायदानाची फेम भेट देवून गौरव करण्यात आला. यावेळी नीलकंठ देशमुख, दिनकर देशमुख, उमेश वाळुजकर, उमेश नगरकर व बंडोपंत मुळे यांच्यासह अनेक दत्तभक्त उपस्थित होते.

# थोडक्यात पण महत्वाचे

## वर्षा पाठक यांना काव्य शिरोमणी पुरस्कार दिल्लीत राष्ट्रीय स्तरावर गौरव



अहिल्यानगर (स. गांवकरी) : साहित्य, शिक्षण आणि कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रा. सौ. वर्षा सचिन रोडे पाठक यांचा दिल्ली येथे राष्ट्रीय स्तरावर गौरव झाला. विश्वात्मक मराठी साहित्य कट्टा यांच्या वतीने आयोजित "साहित्य संस्कृती संगम संमेलन" मध्ये इंटरनॅशनल आयकॉन डॉ.जयलक्ष्मी सानिपींना यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा. सौ. वर्षा पाठक या गेल्या १४ वर्षांपासून अहिल्यानगर आकाशवाणी येथे नैमित्तिक उद्घोषिका म्हणून कार्यरत आहेत. तसेच त्या श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला, सावेडी, अहिल्यानगर येथे ज्युनियर कॉलेज विभागात अध्यापनाचे कार्य करतात. याशिवाय हार्मोनी इंटरनॅशनल स्कूल, वडगाव गुप्ता येथे समुपदेशक म्हणूनही त्या कार्यरत आहेत. साहित्य क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना राष्ट्रीय स्तरावरील "काव्य शिरोमणी" पुरस्कार देण्यात आला आहे. श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेचे शालेय समिती चेअरमन अँड . किशोर देशपांडे व सर्व विश्वस्त, मुख्याध्यापिका तथा प्राचार्य वसुधा जोशी यांनी अभिनंदन व शुभेच्छा दिल्या.

## पेट्रोल - डिझेलचे दर पुन्हा वाढले, तब्बल "एवढ्या" रूपयांनी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : इराण आणि अमेरिका युद्धाचा मोठा परिणाम भारतात बघायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून केंद्र सरकारकडून मोठे निर्णय घेतले जात आहेत. गेल्या १० दिवसांमध्ये आता चौथ्यांदा पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीमध्ये मोठी वाढ झाली. नव्या किमती आज सकाळपासून देशभरात लागू करण्यात आल्या. हा सर्वसामान्य नागरिकांकरिता मोठा दणका म्हणावा लागेल. सतत पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीमध्ये वाढ होत आहे. इराण युद्धात होर्मुज खाडी बंद आहे. होर्मुज खाडी बंद असल्याने ऊर्जेचा तुटवडा आहे. पूर्ण साखळीच विस्कळीत झाली. शिवाय जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीमध्ये सतत मोठी वाढ होत आहे. त्याचाच हा परिणाम भारतात बघायला मिळतोय. देशभरात आज पुन्हा पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ झाली आहे. २५ मे २०२६ रोजी सकाळी ६ वाजल्यापासून पेट्रोलच्या दरात २.६१ रूपयांनी आणि डिझेलच्या दरात २.७१ ने वाढ झाली आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेत ठाणे जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी

ठाणे (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित इयत्ता ५ वी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (PUP) व इयत्ता ८ वी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (PSS) सन २०२६ च्या अंतरिम निकालात ठाणे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जिल्ह्यातील एकूण ३९५ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहे. इयत्ता ५ वीच्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यातील ५०१९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४६७० विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले. यामध्ये ३८४ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. शहापूर तालुक्यातील तब्बल २५६ विद्यार्थी पात्र ठरून तालुक्याने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. मुरबाड तालुक्यातील ६७, भिवंडीतील ३४, कल्याणमधील १६ आणि अंबरनाथमधील ११ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. तसेच इयत्ता ८ वीच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यातील ६८६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६१५ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले. यामध्ये ११ विद्यार्थी पात्र ठरले असून शहापूर तालुक्यातील ८ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. मुरबाड तालुक्यातील २ व अंबरनाथ तालुक्यातील १ विद्यार्थी पात्र ठरला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी दिलेल्या सुचनेनुसार सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेची तयारी व्हावी तसेच शैक्षणिक गुणवत्ता सुधारावी यासाठी इयत्ता ५ वी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (PUP) व इयत्ता ८ वी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (PSS) या शिष्यवृत्ती परिक्षेसाठी नोंदणी करण्यात आली होती.

## टँकरग्रस्त ३९ गावे व १३७ पाड्यांना जिल्हा परिषदेकडून वेळेत पाणीपुरवठा

ठाणे (स. गांवकरी) : उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना ठाणे जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागातील पाणीटंचाईग्रस्त क्षेत्रांमध्ये प्रभावी उपाययोजना राबवून नागरिकांना नियमित व वेळेत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. जिल्हा परिषद ठाणेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या पाणी टंचाई निवारण कार्यक्रमामुळे दुर्गम व आदिवासी भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. जिल्ह्यातील एकूण ३९ गावे आणि १३७ पाड्यांमध्ये टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्यात येत असून सुमारे ५८ हजारांहून अधिक नागरिकांना या उपाययोजनेचा लाभ होत आहे. प्रशासनाच्या नियोजनबद्ध कार्यवाहीमुळे टंचाईग्रस्त भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये यासाठी विशेष दक्षता घेण्यात येत आहे. जिल्ह्यात सर्वाधिक पाणीटंचाई जाणवत असलेल्या शहापूर तालुक्यात विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. शहापूर तालुक्यातील ३३ गावे व १२७ पाड्यांमधील सुमारे ५२ हजार ७७७ नागरिकांसाठी ३७ खाजगी टँकर अधिग्रहित करून नियमित पाणीपुरवठा सुरू ठेवण्यात आला आहे. या टँकर्सच्या माध्यमातून दररोज प्रभावी नियोजन करून नागरिकांपर्यंत पिण्याचे पाणी पोहोचविण्यात येत आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेत कन्या विद्यालय अव्वल

श्रीगोंदा (स. गांवकरी) : नुकत्याच जाहीर झालेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा निकालात श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाने घवघवीत यश संपादन करत आपले अव्वल स्थान कायम राखले आहे. इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल पुढीलप्रमाणे लागला असून एकूण 104 विद्यार्थिनी परीक्षेला प्रविष्ट झाल्या होत्या. त्यापैकी 69 विद्यार्थिनी पात्र ठरल्या असून 35 विद्यार्थिनी अपात्र ठरल्या. गैरहजर विद्यार्थिनींची संख्या शून्य होती. विद्यालयाचा निकाल 66.33 टक्के लागला. इयत्ता पाचवीतील गुणवंत विद्यार्थिनी (195 पेक्षा अधिक गुण) पुढीलप्रमाणे : भूमी दादा साळुंके – 246, सान्वी सुधीर साबळे – 238, सृष्टी काकासाहेब खोसे – 224, श्रावणी उद्धव दिंडे – 222, आरोही शरद तरटे – 220, वैष्णवी रमेश हराळ – 220, अनन्या चंद्रशेखर उदार – 218, वृंदावणी पद्माकर गिरमकर – 210, शुभ्रा हंबीर म्हस्के – 208, प्राची अजित बोरुडे – 206, सलिहा जुबेर पठाण – 206, वेदिका गणेश शेंडगे – 206, अनन्या प्रसाद शिंदे – 204, पायल रावसाहेब दांडेकर – 202, मनस्वी वैभव सोनवणे – 198, राजनंदिनी संदीप राऊत – 198, ईश्वरी ज्ञानदेव पोळ – 196. या विद्यार्थिनींना मराठी विषयासाठी श्रीम. राऊत एस. डी., गणितासाठी श्रीम. वाघचौरे एस. व्ही. (विभागप्रमुख), इंग्रजीसाठी श्रीम. घोडे पी. बी. तसेच बुद्धिमत्ता विषयासाठी श्री. गारुडकर एस. जी. यांनी मार्गदर्शन केले. इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकालही उल्लेखनीय लागला. या परीक्षेसाठी 88 विद्यार्थिनी प्रविष्ट झाल्या होत्या. त्यापैकी 45 विद्यार्थिनी पात्र ठरल्या, 40 अपात्र ठरल्या तर 3 विद्यार्थिनी गैरहजर होत्या. विद्यालयाचा निकाल 52.9 टक्के लागला. इयत्ता आठवीतील गुणवंत विद्यार्थिनी (200 पेक्षा अधिक गुण) पुढीलप्रमाणे : स्वरांजली संदीप भगत – 274, समृद्धी सचिन शेळके – 268, नीता नितीन सप्रे – 264, श्राव्या मच्छिन्द्रनाथ लोखंडे – 262, मयुरी लहू गांगर्डे – 260, प्राची महेश खोत – 254, आराध्या अमोल गांगर्डे – 252.

# चनकापूर धरणाला लागलेला ग्रहण मिटता मिटेना

- पुन्हा एकदा चनकापूर धरणाने घेतला एकाचा बळी
- मासे पकडण्याची ट्यूब वाहून गेली, काढायला गेला अन् काळाने घातला घाला
- अभोणा पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद



कनाशी : (स. गांवकरी)

कळवण तालुक्यातील चनकापूर धरणाने पुन्हा एकदा तरुणाचा बळी घेतला आहे. धरणात मासे पकडण्यासाठी गेलेल्या भगूर्डी येथील २२ वर्षीय यशवंत कौतिक पवार या तरुणाचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना दि. २४ मे २०२६ रोजी दुपारी ३:३० वाजेच्या सुमारास सरले दिगर गावाजवळ घडली. या घटनेने भगूर्डीसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अभोणा पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या अकस्मात मृत्यू रजिस्टर नं. 20/2026 नुसार, यशवंत पवार हा त्याचा मित्र समाधान गोविंद सूर्यवंशी (वय 33, रा. जळगाव ता. निफाड, ह.मु. चणकापूर) याच्यासोबत चनकापूर धरणात दिगर गावाजवळ मासे पकडण्यासाठी गेला होता. मासे पकडून झाल्यावर मासे पॅक करण्यासाठी सोबत असलेली ट्यूब पाण्यात वाहून गेली. ती घेण्यासाठी यशवंत पाण्यात उतरला. मात्र, त्याला खोल पाण्याचा अंदाज न आल्याने तो पाण्यात बुडाला. समाधान सूर्यवंशी याने तत्काळ अभोणा पोलीस ठाण्यात येऊन खबर दिली. खबर मिळताच अभोणा पोलीस ठाण्याचे सपोनि योगिता कोकाटे, तपास अंमलदार पो.ना. 2429 एस.एस. पवार व पथक घटनास्थळी दाखल झाले. स्थानिकांच्या मदतीने शोध घेऊन मृतदेह बाहेर काढण्यात आला. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी कळवण ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. दि. 24/05/2026 रोजी रात्री 21/24 वा. स्टेशन डायरी क्र. 14/2026 नुसार अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 194 प्रमाणे पुढील तपास सुरू आहे. धक्कादायक म्हणजे, चनकापूर धरणात मागील आठवड्यातच एकाचा बुडून मृत्यू झाला होता. सात दिवसांत ही दुसरी घटना असल्याने धरण सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. धरण परिसरात सुरक्षारक्षक नाहीत, धोक्याचे फलक नाहीत, बॅरिकेडिंग नाही, यामुळे अशा घटना घडत असल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत. मयत यशवंत पवार हा घरातील कर्ता मुलगा होता. शेती व मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होता. त्याच्या अकाली मृत्यूने पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. भगूर्डी गावात शोककळा पसरली आहे. "धरणात वारंवार दुर्घटना होत आहेत. पाटबंधारे विभागाने व पोलीस प्रशासनाने धरण परिसरात कायमस्वरूपी सुरक्षारक्षक नेमावेत. धोकादायक ठिकाणी लोखंडी जाळी व मोठे सूचना फलक लावावेत. अन्यथा आंदोलन करू," असा इशारा चनकापूर येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे. अभोणा पोलीस ठाण्याचे तपास अंमलदार पो.ना. एस.एस. पवार यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, "धरणात पोहण्यासाठी किंवा मासेमारीसाठी जाताना जीव धोक्यात घालू नका. खोल पाण्याचा अंदाज येत नाही. लहान मुलांना एकटे सोडू नका. सुरक्षिततेची काळजी घ्या."

## अहिल्यानगर शहरात व्यावसायिकावर हल्ला

### हवेत गोळीबार, धारदार शस्त्राने केले वार

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

सावेडी उपनगरातील पाईपलाईन रस्ता परिसरात रविवारी (२४ मे) सकाळी एका व्यावसायिकावर चार अनोळखी हल्लेखोरांनी हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात व्यावसायिक चिरंजीव गाढवे (वय ३१, रा. गणेश चौक, बोल्हेगाव फाटा) हे जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, हल्लेखोरांनी पळून जाताना हवेत गोळीबार केल्याचे गाढवे यांचे म्हणणे असून पोलिसांना घटनास्थळी निकामी काडतूस आढळून आली आहे.याबाबत गाढवे यांनी दिलेल्या जबाबावरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गाढवे यांची एमआयडीसी निंबळक बायपास परिसरात मनोहर इंजिनियरिंग नावाची कंपनी आहे. ते आपल्या मित्रासोबत रविवारी सकाळी चहा-नाश्त्यासाठी बाहेर गेले होते. सकाळी ८.४५ वाजण्याच्या सुमारास गाढवे व त्यांचे मित्र राजू काळे हे पाईपलाईन रस्त्यावरील तुळजा भवानी मंदिराशेजारी असलेल्या पुणेरी चहा या दुकानात गेले होते. गाढवे हे पाणी बाटली घेण्यासाठी काउंटरजवळ उभे असताना अचानक त्यांच्या पाठीमागून आलेल्या तीन ते चार अनोळखी इसमांनी त्यांच्यावर हल्ला केला. यातील एका हल्लेखोराने धारदार शस्त्राने गाढवे यांच्या पाठीवर वार केला. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे गाढवे घाबरून दुकानाच्या आतमध्ये पळाले. त्यानंतर सर्व हल्लेखोर दुकानात घुसले.

## मदतीसाठी वर्षभर हेलपाटे, तरीही महसूल प्रशासनाचा हलगर्जीपणा

किनवट : (स. गांवकरी)



तालुक्यातील मौजे पाटोदा (बु.) येथील संजय आडेल्लू बावणे यांचे दिनांक १६ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे व पुराच्या पाण्यामुळे राहते घर आणि गाईगुरांचा गोठा पूर्णपणे वाहून गेले होते. नैसर्गिक आपत्तीमध्ये सर्वस्व गमावूनही तब्बल अनेक महिने उलटून गेले तरी महसूल प्रशासनाकडून कोणतीही आर्थिक मदत मिळाली नसल्याने संबंधित कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. या प्रकरणामुळे किनवट तहसील कार्यालयाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात संताप व्यक्त केला जात आहे.

पुरामुळे संजय बावणे यांचे घर, गोठा, घरगुती साहित्य, लोखंडी टिनपत्रे, दरवाजे, विटा, सिमेंट, गिट्टी, लाईट मीटर, नळजोडणी तसेच लोखंडी बैलगाडी यासह सुमारे तीन लाख रुपयांचे नुकसान झाले होते. घटनेनंतर तहसील प्रशासनाच्या आदेशानुसार तलाठी, सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला होता. जिओ टॅग फोटो देखील घेण्यात आले होते. जिल्हाधिकारी कार्यालयातून नैसर्गिक आपत्तीग्रस्त म्हणून पत्रही देण्यात आले. शासनाकडून निधी उपलब्ध झाल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली; मात्र प्रत्यक्षात मदतीची रक्कम अद्यापही लाभार्थ्याच्या खात्यात जमा करण्यात आलेली नाही.

पीडित संजय बावणे यांनी तहसील कार्यालय, उपविभागीय कार्यालय आणि पंचायत समिती कार्यालयात वारंवार लेखी अर्ज देऊन पाठपुरावा केला. २ जानेवारी २०२६, २४ फेब्रुवारी २०२६ आणि ३० मार्च २०२६ रोजी अर्ज सादर करूनही प्रशासनाकडून केवळ आश्वासनेच देण्यात आली. "साहेब भेटत नाहीत", "बजेट आले नाही", "पंचनामा आणा", "सरपंचांची सही नाही" अशा कारणांनी अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ सुरू असल्याचा आरोप बावणे यांनी केला आहे. विशेष म्हणजे संबंधित गावातील काही ग्रामपंचायत पदाधिकारी आणि महसूल विभागातील कर्मचाऱ्यांनी जाणूनबुजून अडथळे निर्माण केल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. मूळ पंचनाम्यावर सही न करणे, पुन्हा डबल पंचनामा तयार करणे, कागदपत्रांची अडवणूक करणे अशा प्रकारांमुळे लाभार्थ्याला शासनाच्या मदतीपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याचे समोर आले आहे. नुकसानग्रस्त संजय बावणे हे शेतमजुरी करून उदरनिर्वाह करतात. मदतीसाठी तहसील कार्यालयाच्या वारंवार चकरा मारताना त्यांचे सुमारे वीस हजार रुपये खर्च झाल्याचे त्यांनी सांगितले. घर नसल्याने कुटुंब अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये सर्वस्व गमावलेल्या नागरिकाला वेळेवर मदत देण्याऐवजी प्रशासनाने हेलपाटे मारायला लावल्याने महसूल विभागाच्या संवेदनशीलतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी तसेच नुकसानभरपाईची रक्कम तातडीने मंजूर करावी, अशी मागणी संजय बावणे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्याकडे केली आहे.

## कृषी उत्पन्न बाजार समिती किनवटच्या सभापतींविरोधात अविश्वास प्रस्ताव

### उपसभापती राहुल नाईक यांच्यासह १३ संचालकांच्या स्वाक्षऱ्या; समितीच्या राजकारणात खळबळ

किनवट : (स. गांवकरी)



कृषी उत्पन्न बाजार समिती, किनवटचे सभापती गजानन मुंडे यांच्या विरोधात उपसभापती राहुल नाईक यांच्यासह 13 संचालकांनी स्वाक्षरी करून अविश्वास प्रस्ताव दाखल केल्याने बाजार समितीच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. हा प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नांदेड यांच्याकडे सादर करण्यात आला असून नियमानुसार विशेष सभा बोलावून गुप्त मतदानाद्वारे निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम 1963 च्या कलम 23 (1) अन्वये हा अविश्वास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. प्रस्तावावर उपसभापती राहुल नाईक यांच्यासह 13 संचालकांच्या स्वाक्षऱ्या असून सभापतींच्या कार्यपद्धतीवर गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. अविश्वास प्रस्तावामध्ये नमूद करण्यात आलेल्या आरोपांनुसार, सन 2025-26 हंगामात बाजार समितीमार्फत खरेदी करण्यात आलेल्या सोयाबीनचे चुकारे अद्याप शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून त्यांच्यात नाराजी वाढत असल्याचा आरोप संचालकांनी केला आहे. तसेच मागील दहा महिन्यांपासून बाजार समितीची मासिक सभा घेण्यात आलेली नसल्याचेही प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. संचालकांनी वारंवार पत्रव्यवहार व तोंडी सूचना देऊनही सभापतींकडून दुर्लक्ष करण्यात आल्याचे म्हटले आहे.

याशिवाय बाजार समितीच्या मागील शेतजमीन विक्रीतून प्राप्त झालेली 1 कोटी 61 लाख रुपयांची रक्कम बँकेत मुदतठेव (FD) स्वरूपात ठेवण्यात आली होती. मात्र संचालक मंडळाला विश्वासात न घेता सभापती व सचिव यांनी संगनमताने सदर FD तोडून रकमेचा अपहार केल्याचा गंभीर आरोप अविश्वास प्रस्तावात करण्यात आला आहे. या प्रकरणात भ्रष्टाचार झाल्याचाही आरोप संचालकांनी केला आहे. सभापतींनी संचालक मंडळाला विश्वासात न घेता मनमानी कारभार केल्याचा आरोप करत बाजार समितीच्या दैनंदिन कामकाजात हलगर्जीपणा व प्रशासकीय अनियमितता वाढल्याचे संचालकांनी नमूद केले आहे. काही महत्त्वाचे अभिलेख व कागदपत्रे लॉक करून ठेवण्यात आल्यामुळे संचालकांना माहिती मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याचेही प्रस्तावात म्हटले आहे. उपरोक्त सर्व कारणांमुळे सभापती गजानन मुंडे यांच्या नेतृत्वावर आमचा विश्वास राहिलेला नसल्याचे संचालकांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे नियमानुसार सात दिवसांच्या आत विशेष सभा बोलावून अविश्वास प्रस्तावावर निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी जिल्हा उपनिबंधकांकडे करण्यात आली आहे. या प्रस्तावासोबत स्वाक्षरी करणाऱ्या सर्व संचालकांची यादी, पत्ते तसेच नोटरी प्रतिज्ञापत्र जोडण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे. अविश्वास प्रस्तावामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती किनवटमध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून पुढील घडामोडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या युवतीसोबत गैरवर्तन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

पोलीस भरतीची तयारी करण्यासाठी येथील बालिकाश्रम रस्ता परिसरात रूमवर राहणाऱ्या युवतीसोबत एका मुलाने गैरवर्तन केल्याची घटना शुक्रवारी (२२ मे) मध्यरात्री घडली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात संशयित अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे.मुळची जामखेड तालुक्यातील युवतीने यासंदर्भात शनिवारी (२३ मे) फिर्याद दिली आहे. फिर्यादी सध्या बालिकाश्रम रस्ता परिसरात भाड्याच्या खोलीत राहून पोलीस भरतीचा सराव करते. घटनेच्या रात्री तिच्या खोलीतील इतर मुली गावी गेल्या असल्याने ती खोलीत एकटीच होती. मध्यरात्री साडेबारा वाजेच्या सुमारास शेजारच्या खोलीत राहणाऱ्या एका मुलाने खिडकी वाजवून पिण्यासाठी पाणी मागितले. युवतीने शेजारी म्हणून ओळखीपोटी दरवाजा उघडून त्याला पाण्याची बाटली दिली. पाणी घेतल्यानंतर तो मुलगा बाहेर न जाता जबरदस्तीने खोलीत घुसला. युवतीने त्याला बाहेर जाण्यास सांगितले असता, त्याने तिला आत ढकलून तिचा विनयभंग केला. युवतीने प्रसंगावधान राखून आरडाओरडा केल्याने तो मुलगा तेथून पळून गेला.

या घटनेमुळे प्रचंड घाबरलेल्या युवतीने सकाळी आपल्या नातेवाईकांना फोन करून घडलेला प्रकार सांगितला. नातेवाईकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत संबंधित मुलाला पकडले आणि तोफखाना पोलीस ठाण्यात आणले. पीडित युवतीच्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून पुढील तपास महिला पोलीस अंमलदार प्रमिला गायकवाड करीत आहेत.

## प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार यांना पुरस्कार जाहीर

नवीन नांदेड : (स. गांवकरी)



अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने दिला जाणारा यंदाचा मानाचा आणि प्रतिष्ठेचा समजला जाणारा 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार -२०२६' डॉ. शेखर घुंगरवार यांना जाहीर करण्यात आला आहे.

वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार यांना फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीत शैक्षणिक, सामाजिक, वैचारिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने नुकतेच त्यांना या पुरस्काराचे निवड पत्र प्रदान करण्यात आले. सन्मानपत्र व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि.२६ जून २०२६ रोजी सिडको नवीन नांदेड येथे विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांच्या हस्ते डॉ. शेखर घुंगरवार यांना प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार - २०२६निवड समितीचे प्रमुख एड. सुजाता पोहरे, डी.एस.वाघमारे, बा.रा.वाघमारे यांनी दिली. प्राचार्यडॉ. शेखर घुंगरवार यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोगी डॉ. नानासाहेब जाधव, माजी नगरसेवक अ‍ॅड.श्रीनिवास जाधव, प्राचार्य डॉ. विकास कदम तसेच शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्षेत्रातील मान्यवर मंडळींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर पित्त पत्रिका करणे टाळा

तामसा : (स. गांवकरी)

पत्रकार या बातमीदार लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून ओळखला जातो जनसामान्याचे प्रश्न आपले लेखणीतून जगासमोर वास्तव मांडणी करतो पण कधी चुकीचे वृत् छापून पीत पत्रकारीता करतो तेव्हा लोकशाही जिवंत ठेवायचे असेल तर सर्व पत्रकारांनी पित्त पत्रकारिता करणे टाळावी .असे मत व्हॉईस ऑफ मिडिया पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा . डॉ .गणेश जोशी यांनी तामसा तालुका हादगाव येथे हादगाव हिमायतनगर विधानसभा क्षेत्रातील पत्रकार मेळावा पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक पदावरून बोलताना व्यक्त केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष आनंद पाटील घंटलवाड हे होते तर प्रमुख उपस्थिती आमदार बाबुराव कदम कोहोळीकर रमेश घटलवार, स . द कल्याणे सहायक पोलीस निरीक्षक सहदेव खेडकर पोलीस उपनिरीक्षक बालाजी नरवटे,बालाजी महाजन पंडित पतंगे, प्रकाश जैन यांचे उपस्थिती होती . कार्यक्रमाच्या प्रस्ताविक




प्रा .डॉ . गणेश जोशी

भाषणात बालासाहेब खानजोडे यांनी पत्रकारावर होत असलेल्या बाबत विवेचन करून पत्रकार एकजुटीने राहाणे व पत्रकारांच्या सुखदुःखात सहभागी होणे पत्रकार कुठला अन्याय होणार नाही याची काळजी घेण्यासाठी हा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले यावेळी प्रा .डॉ . गणेश जोशी पुढे बोलताना म्हणाली पत्रकाराच्या संघटना अनेक झाल्या त्यांनी ऐनवेळी एक त एकजूट होऊन पत्रकाराच्या समस्या सोडविण्याचे काम करावे कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्याची आपण हुजरेगिरी करू नये त्यांचे चांगल्या कामाची वाहवा जरूर करा पण वाईट कामाच्या बाबतीत प्रखरपणे लेखन करा पत्रकाराचे काम आहे .सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून देणे होईल आपल्या लेखणीतून वास्तव लेखन केले की सर्वसामान्यांना न्याय मिळतो पत्रकारा वाघ आहे तसेच जंगलात एक वाघ पाहिला तर आपण पळून जातो तसेच आपली वचक वाघाप्रमाणे असली पाहिजे कोणाच्या आमिषाला बळीने पडता प्रखरपणेने लिखाण करा लेझीम खेळत संध्याकाळी घरी जाऊ नका असा मौलाचा सल्लाही त्यांनी आपल्या भाषणातून दिला .यावेळी आ . बाबुराव कदम कोहळीकर यांनी आपल्या भाषेत म्हणाले की माझ्या विधानसभा क्षेत्रातील सर्व पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी तयार आहे आणि त्यांचा जीवन विमा आरोग्य विमा दरवर्षी मी माझ्या पैशाने काढत जाईल यासाठी लागणारे कागदपत्र माझ्या कार्यालयात आणून द्या असा सल्ला देऊन कार्यक्रम शुभेच्छा दिल्या सदर कार्यक्रमात आचार्य बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार पत्रकार गौतम कदम,सुनील चौरे,गौतम वाठोरे,गौतम रणवीर, महेंद्र धों गडे यांना तर डॉ . बाबासाहेब आंबेडकर पत्रकारिता पुरस्कार शशिकांत धानोरकर,इस्माईल पिंजारी, सोपान बोंबीलवार नागेश शिंदे, रामेश्वर बोरकर तर उद्योजक म्हणून बालाजी घंटलवार , कदम बंटी राठोड सुशील देशमुख या सर्वांचा सन्मान करण्यात आला सरसेनापती नेताजी पालकर उत्कृष्ट पुरस्कार म्हणून दीपक सूर्यवंशी, प्रकाश जैन यांना पुरस्कार देऊन करण्यात आला या कार्यक्रमात दहावी-बारावी वर्गात विशेष पुरविण्याचे पास झालेल्या मुला मुलींचा पालकासह येथे सत्कार करण्यात आला तसेच ज्येष्ठ पत्रकारांचे या कार्यक्रमात सहकुटुंब सत्कार करण्यात आला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### रोटरी आयोजित अंध मुलांच्या ऑर्केस्ट्राचा ठाणेकरांनी लुटला आनंद

ठाणे (स. गांवकरी) : समाजकार्यामध्ये रोटरी क्लबचे योगदान नेहमीच महत्त्वपूर्ण राहिले असून विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. रोटरी क्लब ऑफ ठाणे लेकसिटीने अंध मुलांसाठी सुरू केलेला कौशल्य विकास उपक्रम खरोखरच कौतुकास्पद आहे असे गौरवोद्गार ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपलोळकर यांनी काढले. पालिका शाळा क्रमांक १९ येथील रोटरी भवनामध्ये अंध विद्यार्थ्यांतर्फे आयोजित ऑर्केस्ट्रा कार्यक्रम सादर करण्यात आला. यावेळी ठाणे महापालिकेचे उपायुक्त मनीष जोशी, स्थानिक नगरसेवक सुनेश जोशी, रोटरी क्लबचे गव्हर्नर, रोटरी क्लब ऑफ ठाणे लेकसिटीच्या अध्यक्षा दिपाली महेंद्र, माजी अध्यक्ष तसेच अमोल धर्मे, गणेश दरेकर, हेमाली शहा आदी पदाधिकारी उपस्थित होते. ठाणे पूर्व येथील शाळा क्रमांक ९ मध्ये रोटरी क्लब ऑफ ठाणे लेकसिटीतर्फे अंध मुलांना "सारथी" या नावाने कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिले जाते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी हिंदी व मराठी गीतांचा सुरेल संगीत कार्यक्रम सादर केला. निधी संकलनाच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपायुक्त मनीष जोशी यांनी रोटरी क्लब ऑफ ठाणे लेकसिटीच्या कार्याचे कौतुक केले. महापौर शर्मिला पिंपलोळकर यांनी अंध विद्यार्थ्यांच्या ऑर्केस्ट्रा कार्यक्रमाचे विशेष अभिनंदन करत, भविष्यात महापालिकेच्या विविध कार्यक्रमांमध्ये या विद्यार्थ्यांच्या ऑर्केस्ट्राचा समावेश करण्यात येईल, तसेच पालिकेच्या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन करण्याची संधीही त्यांना देण्यात येईल, असे सांगितले. नगरसेवक सुनेश जोशी यांनी या उपक्रमासाठी आपल्या एका महिन्याच्या मानधनाची देणगी देण्याची घोषणा केली. कार्यक्रमाला रोटरी क्लबचे विविध पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### महेश्वर मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या विसापूर शाखेचे उद्घाटन

श्रीगोंदा (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील नावाजलेली महेश्वर मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या विसापूर (ता. श्रीगोंदा) येथील नवीन शाखेचे उद्घाटन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी बोलताना प्रा. राम शिंदे म्हणाले की, ठेवीदारांचा विश्वास आणि संस्थेची सेवाभावी वृत्ती यामुळे महेश्वर मल्टिस्टेट सोसायटी निश्चितच अधिक उंची गाठेल. ग्रामीण भागातील आर्थिक विकासात अशा संस्थांची भूमिका महत्त्वाची असल्याचेही त्यांनी नमूद केले. सन २०११ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेने अल्पावधीतच १८ शाखांचे मजबूत जाळे उभे केले आहे. ग्रामीण भागातील आर्थिक सक्षमीकरणासाठी प्रभावीपणे कार्य करत सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी आणि व्यावसायिकांना आर्थिक आधार देण्याचे काम संस्था करत आहे. तसेच रोजगार निर्मितीतही संस्थेचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमास तालुक्याचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री बबनराव पाचपुते, माजी आमदार राहुल जगताप, नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे, महेश्वरचे संस्थापक चेअरमन दत्तात्रय गावडे, घनश्याम शेलार, राजेंद्र म्हस्के, राजेश पाचपुते, माजी जिल्हा परिषद सदस्य दिनूकाका पंदरकर, हरिदास शिर्के, लोकनियुक्त सरपंच पुरुषोत्तम लगड, अजित हजारे, विठ्ठलराव वाडगे, प्रशांत दरेकर, बाळासाहेब काटे, महेश्वर मल्टिस्टेट सोसायटीचे व्हाइस चेअरमन अनिल भदागरे, भूषण बडवे यांच्यासह ग्रामस्थ, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



### माजी मंत्री आदित्य ठाकरे यांची डॉ. विश्वासराव आरोटे यांनी घेतली भेट

मुंबई (स. गांवकरी) : उ.बा.ठा. शिवसेना गटाचे युवा नेतृत्व तथा माजी मंत्री आ. आदित्य ठाकरे यांची निवांत क्षणी भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी राज्यातील विविध घडामोडींसह सर्वसामान्य नागरिकांशी संबंधित विषयांवरही संवाद झाला. तसेच, सध्या काही ठिकाणी डिझेल-पेट्रोल पंप चालक व मालक ग्राहकांकडून जादा दराने विक्री करत असल्याची माहिती यावेळी माजी मंत्री आ. आदित्य ठाकरे यांना देण्यात आली. याबाबत संबंधित यंत्रणांनी लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक विश्वासराव आरोटे उपस्थित होते. विविध सामाजिक, पत्रकारिता आणि जनहिताच्या विषयांवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

### सलग तिसऱ्या दिवशी मन मोहक ढगाळ वातावरण : पर्यटकांची मोठी गर्दी

डांग, गुजरात (स. गांवकरी) :गुजरातच्या एकमेव हिल स्टेशन असलेल्या सापुतारा तसेच संपूर्ण डांग जिल्ह्यात सलग तिसऱ्या दिवशीही ढगाळ वातावरण पाहायला मिळत आहे. भर उन्हाळ्यात अचानक बदललेल्या या आल्हाददायक वातावरणामुळे संपूर्ण परिसरात गारवा पसरला असून नागरिकांना उकाड्यापासून मोठा दिलासा मिळाला आहे. आकाशात दाटलेले काळेकुट्ट ढग आणि पहाटे दिसणारी धुक्याची चादर यामुळे चक्क पावसाळ्यासारखे रम्य वातावरण निर्माण झाले आहे. डांगमधील डोंगराळ भाग आणि हिरव्यागार दऱ्या या ढगाळ वातावरणात अधिक खुलून दिसत असून, निसर्गप्रेमींसाठी ही पर्वणी ठरत आहे. या मनमोहक हवामानाचा आनंद घेण्यासाठी महाराष्ट्र आणि गुजरातच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने पर्यटक सापुताऱ्याकडे दाखल होत आहेत.

# शिवरस्ते, वहिवाट व शेतरस्ते प्रश्न मार्गी लावण्यासाठी सकारात्मक चर्चा

## राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांची माहिती

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यात गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले शिवरस्ते, वहिवाट रस्ते आणि शेतरस्ते प्रश्न पावसाळ्यापूर्वी शक्य तितक्या लवकर निकाली काढण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी स्तरावर महत्त्वपूर्ण हालचाली सुरू झाल्या आहेत.



"रस्ते आदर्श तालुका" ही संकल्पना राबविण्याच्या दृष्टीने तालुक्यात विविध ठिकाणी शिवरस्त्यांची मोजणी, सीमांकन आणि अतिक्रमणमुक्त प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली आहे. यासंदर्भात क्षत्रिय समिती अध्यक्ष आमदार विक्रमसिंह पाचपुते यांची भेट घेऊन सविस्तर आणि सकारात्मक चर्चा करण्यात आल्याची माहिती शेतपानंद रस्ता चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी दिली. या बैठकीत पावसाळ्यापूर्वी प्राधान्याने रस्ते खुले करणे, मोजणी पूर्ण झालेल्या रस्त्यांचे सीमांकन करणे, आवश्यक निधी उपलब्ध करून देणे तसेच शेतरस्ते व वहिवाट रस्ते प्रकरणे तातडीने निकाली काढण्याबाबत चर्चा झाली. तसेच खुले करण्यात आलेल्या रस्त्यांची सातबारा उताऱ्यात व गाव नकाशात नोंद करण्यासंदर्भातही विचारविनिमय करण्यात आला. तालुकास्तरावर समन्वय वाढवण्यासाठी क्षेत्रीय समित्या स्थापन करण्याचाही प्रस्ताव मांडण्यात आला. आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी सांगितले की, श्रीगोंदा तालुक्यात "रस्ते आदर्श तालुका" संकल्पना प्रभावीपणे राबविण्यासाठी शासन स्तरावर सकारात्मक पाठपुरावा सुरू आहे. मोजणी व सीमांकन पूर्ण करून प्रत्यक्ष खुले करण्यात आलेल्या रस्त्यांसाठी शासनाकडून प्रति किलोमीटर १२ लाख रुपये निधी उपलब्ध करण्याचे नियोजन करण्यात आले असून, सुरुवातीच्या टप्प्यात सुमारे २५ किलोमीटर रस्त्यांसाठी निधी मंजुरीची प्रक्रिया सुरू आहे.

सीमांकन पूर्ण झालेल्या गावांना टप्प्याटप्प्याने निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. मंत्रालयात महसूल मंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत श्रीगोंदा तालुक्यात सुरू असलेल्या शेत, वहिवाट व शिवरस्ते कामांचा विशेष आढावा घेण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. महसूल मंत्री स्वतः या कामांवर लक्ष ठेवून असून वेळोवेळी प्रगतीचा आढावा घेत असल्याचेही त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले हे प्रश्न केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष बांधावर जाऊन सोडवले जात असल्यामुळे अनेक गावांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. रस्ते मोकळे झाल्यामुळे शेतीमाल वाहतूक, पावसाळ्यातील ये-जा, शालेय विद्यार्थ्यांची गैरसोय, आपत्कालीन सेवा आणि दैनंदिन व्यवहारांमध्ये मोठा दिलासा मिळणार आहे. "रस्ते आदर्श तालुका" व "रस्ते आदर्श गाव" ही संकल्पना यशस्वी करण्यासाठी प्रशासन, भूमी अभिलेख विभाग, महसूल विभाग, लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ आणि चळवळीतील पदाधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. लवकरच पुढील नियोजन करून प्रलंबित रस्ते प्रश्नांवर ठोस कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन आमदार पाचपुते यांनी दिले. दरम्यान, "शिवपानंद शेत रस्ता चळवळ महाराष्ट्र राज्य"च्या माध्यमातून तालुकास्तरीय क्षेत्रीय समित्या स्थापन करून रस्त्यांशी संबंधित प्रश्न मार्गी लावण्यासाठी क्षेत्रीय समिती अध्यक्ष व उपविभागीय अधिकाऱ्यांशी सातत्याने पाठपुरावा करण्याचे आवाहन राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी केले आहे.

## पोलिसांनी घडवली तामस्याच्या हरवलेल्या भावी डॉक्टरची कुटुंबाशी भेट

तामसा : (स. गांवकरी)

डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणारा आणि होमिओपॅथीच्या तिसऱ्या वर्षात शिक्षण घेणारा हदगाव तालुक्यातील तामसा/वायपणा गावचा तरुण मुंबईच्या रस्त्यावर भीक मागताना आढळल्याने सबंध हदगाव तालुक्यात खळबळ उडाली आहे. मालाड पोलिसांच्या संवेदनशीलतेमुळे तब्बल दोन महिन्यांनंतर अभयची आपल्या कुटुंबाशी भेट झाली. त्याच्या कुटुंबाच्या आनंदाला पारावार उरला नाही. एकीकडे डोळ्यात अश्रू घेऊन अभय म्हणून मारलेली हृदयद्रावक हाक.... तर दुसरीकडून आई-बाबा म्हणून मारलेली मिठी... हे मन हेलावून टाकणारे दृश्य पाहून पोलिसांच्याही डोळ्यातून अश्रू ओघळले. बेळकोणे कुटुंबाने मालाड पोलिसांचे आभार मानले. वायपणा/तामसा गावचा अभय सुरेश बेळकोणे



(वय 25 वर्ष ) हा दीड महिन्यांपूर्वी कॉलेजला जातो म्हणून घरातून बाहेर पडला आणि दीड महिना त्याचा कुटुंबाशी संपर्क तुटला. मालाड एस. व्ही. रोड परिसरात गुरुवारी पहाटे भिकाऱ्याविरोधात कारवाई कामी गस्त घालतांना मुंबईतील मालाड पोलीस पथकातील बीट अमलदार कोमलसिंग जाधव यांच्या नजरेत फूटपाथवर गोंधळलेल्या व अस्वस्थ अवस्थेत बसलेला एक वीस वर्षीय तरुण आढळला.

## शिवश्री सोमनाथ गोडसे यांची संभाजी ब्रिगेड तालुकाध्यक्षपदी नियुक्ती

### शाम पोळ यांची तालुका उपाध्यक्षपदी निवड

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

संभाजी ब्रिगेडच्या श्रीगोंदा तालुकाध्यक्षपदी शिवश्री सोमनाथ संजय गोडसे यांची, तर तालुका उपाध्यक्षपदी शाम पोळ यांची नियुक्ती करण्यात आली. संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

पुणे येथे छत्रपती संभाजी महाराज उद्यानात बुधभूषण ग्रंथरचनाकार छत्रपती श्री संभाजी महाराज स्मारक अनावरण निमित्त आयोजित आनंदोत्सव कार्यक्रमात हा नियुक्ती सोहळा पार पडला. यावेळी श्रीगोंद्यातून २० गाड्यांचा ताफा व शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते. संभाजी महाराजांना अभिवादन करून कार्यकर्ते पुण्याकडे रवाना झाले. काष्टी येथे बंडू तात्या जगताप यांनी स्वागत केले, तर पुढे टोलनाक्यावर



संदीप महाराज पाचपुते यांनी स्वागत करून सहकार्य केले. यावेळी जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे, श्रीगोंदा मार्केट कमिटीचे माजी सभापती सुरेश आण्णा सुडगे, माजी सरपंच बापूराव फंड, सोसायटी चेअरमन कैलास मते, जिल्हा संघटक गणेश पारे, वैभव वनशिव, वैभव हिरडे, महेश हिरडे, ओम कापसे, शहराध्यक्ष अभिषेक सावंत, किशोर सावंत, मच्छिंद्र भांडवलकर, दिगांबर फंड, शिवाजीराव जगदाळे, संजय गोडसे, सुमंत थोरात, दादा पाटील रोडे, सुभाष बुधवंत, बाळू बुधवंत, सतीश गोडसे, प्रथमेश गोडसे, अक्षय कदम, सागर जगदाळे, सागर गोडसे, अनिकेत मोतेकर, अनिल गोडसे, धनंजय गोडसे, सौरभ हरिहर, अशपाक शेख, दत्ता भांडवलकर, गणेश झगडे, विकास कानगुडे, संदीप शिंदे, गणेश पवार, अमोल गोडसे, नाना गोडसे, शुभम गोडसे, कृष्णा गोडसे, बाळू मोतेकर, सचिन गोडसे, दत्ता हरिहर, घनश्याम दरवडे, बाळासाहेब माडगे, मिठू काळे, भाऊ माने आदी मान्यवर व शंभूप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवडीबद्दल उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी तालुकाध्यक्ष सोमनाथ गोडसे यांनी तालुक्यात गावोगावी नवीन कार्यकर्ते जोडून नवीन शाखा सुरू करण्याचा संकल्प व्यक्त केला. तसेच निवडीबद्दल सर्व मान्यवरांचे आभार मानले.

## जलसंधारण विभागातील गैरहजेरी, महावितरणच्या कारभाराविरोधात श्रीगोंद्यात प्राणांतिक उपोषण; प्रशासनाला ठोस कारवाईची मागणी

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील जलसंधारण विभागाच्या कथित अनियमित कारभाराविरोधात तसेच महावितरणच्या वीज व्यवस्थापनातील त्रुटींविरोधात सोमवारी श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर प्राणांतिक उपोषण करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल ठवाळ यांनी केले. आढळगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंच तथा माजी पंचायत समिती सदस्या अनुराधाताई ठवाळ यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



आंदोलनकर्त्यांनी जलसंधारण विभागाच्या उपविभागीय अभियंता कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या नियमित गैरहजेरीचा मुद्दा उपस्थित केला. शेतकऱ्यांशी संबंधित विविध योजना, बंधारे दुरुस्ती तसेच 'पाणी अडवा, पाणी जिरवा' यांसारख्या कामांवर याचा विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप करण्यात आला. कार्यालयीन वेळेत अधिकारी उपलब्ध नसल्याने नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

दुसरीकडे, महावितरणच्या कामकाजावरही तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होणे, भारनियमन, तांदळी दुमाला सबस्टेशनवरील वाढता ताण, नवीन ट्रान्सफॉर्मरची गरज, आढळगाव परिसरात नवीन सबस्टेशन मंजूर करणे तसेच अतिरिक्त वायरमन व लाईनमन नेमणूक करावी, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

महावितरणच्या आढळगाव येथील सहायक अभियंत्यांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली. यापूर्वी अनेक वेळा निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याचा आरोप करत अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे अनिल ठवाळ यांनी सांगितले.

यावेळी अनिल ठवाळ, अनुराधाताई ठवाळ, राजेंद्र म्हस्के, श्रीकांत ठवाळ, प्रशांत दरेकर, मिलिंद कदम, गंगुबाई शिंदे, संपत काळे, सरपंच गांगर्डे, तहसीलदार सचिन डोंगरे, महावितरण अधिकारी इंदलकर आदी उपस्थित होते.

## पांडुरंग पवार यांना 'आदर्श पदाधिकारी पुरस्कार' जाहीर

निमगाव सावा : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागाच्या विकासात मोलाचा वाटा उचलणारे, श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष व सर्वांचे प्रेरणास्थान असलेले आदरणीय श्री. पांडुरंगजी पवार साहेब यांना पुणे जिल्हा परिषदेचा अत्यंत मानाचा 'आदर्श पदाधिकारी पुरस्कार' जाहीर झाला आहे. त्यांच्या गेली चार दशकांच्या निस्वार्थ सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्याची दखल म्हणून हा पुरस्कार देण्यात येत असल्याचे जिल्हा परिषदेकडून कळविण्यात आले आहे. या पुरस्कारामागील त्यांचे योगदान हे पांडुरंगजी पवार यांनी आध्यात्मिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक व शैक्षणिक अशा विविध क्षेत्रांमध्ये आपल्या कार्याच्या माध्यमातून ठसा उमटविला आहे. जुन्नर तालुक्याच्या पूर्वपट्ट्यात, जिथे विकासाची गंगा पोहोचली नव्हती, तिथे त्यांनी शिक्षणाची व सहकाराची गंगा आणली व या भागाचा कायापालट घडविला. त्यांनी अनेक भूषविलेली महत्त्वाची पदे आणि सर्वोत्तम कार्य केले आहे शरद सहकारी बँकेचे संचालक म्हणून बँकेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी व युवकांना आर्थिक बळ दिले. आदर्श नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य असोसिएशन महाराष्ट्र राज्याचे सरचिटणीस पदाच्या काळात राज्यभरातील सदस्यांच्या प्रश्नांना वाचा फोडून त्यांच्या हक्कासाठी ते सातत्याने लढले. पुणे जिल्हा परिषदेचे मा.उपाध्यक्ष काळात त्यांनी ग्रामीण भागातील रस्ते, पाणी, आरोग्य व शिक्षणाच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन अनेक योजना मार्गी लावल्या. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, निमगाव सावा चे अध्यक्ष पदावर असताना धार्मिक क्षेत्रातही त्यांनी मोलाचे योगदान देऊन मंदिर परिसराचा विकास केला व वारकरी संप्रदायाच्या कार्याला चालना दिली.

# जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था लवकरच तिसऱ्या क्रमांकावर झेप घेणार : मुख्यमंत्री

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत 'राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती' कार्यक्रम मुंबईत साजरा

मुंबई : (स. गांवकरी)

मोदींनी प्रथम शपथ घेतली त्यास बारा वर्षे पूर्ण झाली. देशाचा स्वाभिमान जागृत ठेवून त्यांनी परिवर्तन करून दाखविले. आज जगाच्या पाठीवर देश स्वाभिमानाने उभा आहे. भारताची वाटचाल नवनिर्माणाची असून मोदींच्या नेतृत्वात गरीबांच्या विकासाला गती दिली. त्यांनी २५ कोटी गरीबांना गरीबरेषेच्या वर आणले. अर्थव्यवस्थेची प्रगती थक्क करणारी आहे. जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यस्था लवकरच तिस-या क्रमांकावर झेप घेणार, असे मत




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. मुंबईच्या प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिरात झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. अर्थिक नवीन विचार मांडण्याचा प्रत्यक्षात साकार केला. हा विस्तार विकासाचा अजेंडा उभा केला. भारत माला, सागर माला मध्यातून रोड चे नेटवर्क उभे केले. यावेळी 'राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती' या मराठी व हिंदी भाषेतील कॉफी टेबल बुकचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी मंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम, आ. निरंजन डावखरे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आदी उपस्थित होते. तत्कालिन युपीए सरकारवर टीकास्त्र सोडतांना श्री. फडणविस म्हणाले की, वाढवण बंदरची फाईल बंद केली होती. आता जेएनपीटीच्या तिप्पट वाढवण बंदर झाले आहे. हा आता अभिमानाचा विषय झाला आहे. जपान, चीनपेक्षाही आपली रेल्वे आता प्रभावी झाली आहे. युपीए सरकारला जीएसटी आणता येत नव्हते. पण मोदींनी सर्वांना विश्वासात घेवून जीएसटीचा प्रयोग यशस्वी करून दाखविला. आता केंद्र व राज्य हा संघर्ष होत नाही, याला कारण मोदींची धोरणे आहेत. बारा वर्षे 'राष्ट्र प्रथम' विचारधारेची, अंत्योदयातून घडणा-या विकसित भारताची माहीती सविस्तरपणे देतांना नवीन भारत कोणाच्याही दबावाखाली येत नाही, हे स्पष्ट केले. शिर्डी येथे नुकताच संरक्षण खात्यातून सुरू केलेल्या उत्पादनाची पहीली मागणी इस्त्राईलने केली आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मोदी सरकारने 12 वर्षात पार दर्शक कारभार केले. शेवटच्या व्यक्ती प्रयत्न योजना पोहचवण्याचा फायदा होत आहे. मोदी सरकारने देशाला दिशा देण्याचे काम केले. सर्व सामान्य लोकांन पर्यंत सरकारचे काम गेले पाहिजे. माध्यम क्षेत्रातील दिग्गजांनी ही माहीती समाजापर्यंत पोहोचावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.